# श्रीमंत नानांचा वाडा


## लेखिका

### सौ. अनघा अशोक फडणीस


## कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या सौजन्याने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

पुस्तकाचे नाव : श्रीमंत नानांचा वाडा

लेखिका : सौ. अनघा अशोक फडणीस<br>मो.क्र. – ९८८१३ ७३५८५

प्रकाशक : बहुजन साहित्यधारा, पुणे<br>११ ए, राहुल कॉम्प्लेक्स,<br>चौथा मजला, पौड रोड, पुणे.<br>दुरध्वनी : ९८८१३७३५८५<br>हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

प्रकाशन दिनांक : २५ डिसेंबर २०२२ पहिली आवृत्ती

मुद्रक : श्री वेंकटेश पब्लिकेशन, पुणे<br>हिंगणे खुर्द, सिंहगड रोड. मो. क्र. ८२३७८ ९३३४७

पुस्तकाचे हक्क : ॲड. नंदिनी शहासने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

मूल्य : रूपये ५०/–

संपर्क : श्री. हेमंत प्रभाकर आळवे, ठाणे<br>मो. : ९३२२२६९७२१<br>श्री. अशोक जनार्दन फडणीस, मेणोली–वाई<br>९८५०५ ०९४१६<br>श्री. भानुदास सोपान पायगुडे, धनकवडी–पुणे<br>९८५०३५१०३५


Or Pay to VPA

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे या संस्थेस दिलेल्या देणग्या आयकर माफीस प्राप्त आहेत.
No.: THN/C.I.T.II/Tech/80G/104/2010-11/1479 Dt: 21/09/2010





# श्रीमंत नानांचा वाडा



कै. सुधा ज. फडणीस



कै. जर्नादन बाळाजी उर्फ तात्यासाहेब फडणीस

## अर्पण पत्रिका

माझे सासरे कै. जनार्दन बाळाजी उर्फ तात्यासाहेब फडणवीस (चौथी पिढी) यांजवर माझी अपार निष्ठा होती तेच माझे श्रद्धास्थान व प्रेरणास्थान आहे.

त्यांच्या स्मृतीस स्मरुन आणि श्री लक्ष्मी नारायणाच्या आशिर्वादाने श्रीमंत नाना फडणवीसांच्या . संबंधीच्या माहितीचे लेखन व प्रकाशन करीत आहे

## लेखिकेचे मनोगत

माझे पती श्री. अशोक जनार्दन फडणीस हे नानाचे पाचवे वंशज आहेत. म्हणजे आतांची पाचवी पीढ़ी आहे. मी नानाची स्नुषा (सून). याचा मला अभिमान वाटतो. त्यांच्या वास्तुत मला त्यांच्या कतृत्वाच्या खुणा जागोजागी दिसतात. मेणवली येथील वाडयात जाऊन येऊन आम्ही मुक्काम करतोच वाड्यातील वास्तव्यात मला असे लक्षात आले की, वाडा बघावयास येणाऱ्या लोकांमधील बऱ्याच जणांना नानांच्या व्यक्तिविशेषासंबंधी माहिती असत नाही. त्याच प्रमाणे त्यांना घाट, वाडा यांची ही माहिती हवी असते त्याची गरज ओळखून आणि त्यासंबंधी माहिती देणे हे माझे कर्तव्य आहे असे समजून हे छोटेसे लेखन केले आहे.

**लेखिका**

**सौ. अनघा अ. फडणीस**

*****





।। श्री ।।

।। श्री लक्ष्मी नारायण प्रसन्न ।।

## श्रीमंत नानांचा वाडा

मराठ्यांच्या इतिहासात अनेक थोर पुरुषांनी योगदान दिलेले आहे. पैकी नाना फडणवीस हे एक. आपल्या असामान्य बुद्धीचार्तुयाने, कर्तृत्वाने आणि अपार कष्टाने स्वराज्याचे रक्षण करण्याचे, टिकविण्याचे आणि ते वाढविण्याचे कार्य नाना फडवणीसांनीच केले आहे.

एक निष्ठावंत प्रशासक आणि कर्तबगार स्वराज्यसेवक अशीही इतिहासात त्यांची ख्याती आहे. त्यांच्या विषयाची थोडक्यात माहिती जाणून घेऊ.

## जन्म आणि बालपण

नाना फडणवीसांचा जन्म १३ फेब्रुवारी १७४२ साली (माघ कृ. ४) झाला. त्यांचे जन्मगाव सातारा हे आहे. त्यांचे मूळ घराणे वेळास येथील भानूंचे.

वेळास हे गाव रत्नागिरी जिल्ह्यात आहे. (त्यांचे मूळचे आडनाव भानू होय.) पुढे फडणवीस या हृदयावरून त्यांचे आडनाव फडणवीस पडले. नानांच्या आजोबांना पेशवाईची फडणवीशी मिळाली होती. पुढे ही फडणवीशी नानाचे वडिलांना मिळली. नानांच्या वडिलांचे नाव जनार्दन तर आईचे नाव रुक्मिणी होते. त्यांचे संपूर्ण नाव बाळाजी जनार्दन भानू (फडणवीस) असे होते

नानांचे वडिल व चुलते दोघे फडणवीशी सांभाळत. ते नेहमी जास्त काळ मोहिमेवर असत. त्यांचे घराकडे थोडे कमी लक्ष असे. मात्र घरातील स्त्रिया ही जबाबदारी पार पाडीत. नानांची आई त्यांच्या शिक्षणाचे बाबतीत सतर्क राहून त्यांनी चांगला विद्याभ्यास करावा म्हणून प्रयत्न करीत असे. परंतू नानांचा कल

फारसा शिक्षणाकडे नव्हता. मुंज होईपर्यंत त्यांचे शिक्षण फारसे होऊ शकले नाही. नंतर मात्र खुद्द पेशव्यांबरोबरच त्यांचे शिक्षणाची सोय झाली. त्या काळच्या शिक्षणपद्धतीनुसार, उत्तम वळणदार अक्षर, हिशेब लिहीणे, सरकारी, जहागीरीच्या कामांची माहिती तसेच इतर अनेक व्यवहार्य गोष्टींचे शिक्षण दिले जाई या शिवाय राज्याचा इतिहास, भूगोल यांचे शिक्षण देत असत. घोड्यावर बसणे, तलवार, भाला, बंदूक चालविणे याचेही शिक्षण होते. धार्मिक शिक्षणही दिले जाई. यात संध्या, रुद्र, पवमान यांचा अभ्यास करून घेतला जाई. शारिरीक शिक्षणाला विशेष महत्व असे. जोर, बैठका, कुस्त्या, यांसरखे व्यायाम करावे लागत. नानांची शरीरप्रकृती किरकोळ होती. शारिरीक व्यायाम त्यांना फारसा रुचत नसे. त्यांची बुद्धिमत्ता मात्र कुशाग्र होती. वृत्ती अभ्यासू होती. फारच कमी कालावधित त्यांनी सर्व विद्या आत्मसात करून घेतल्या. त्यांच्या चाणाक्षपणाचे सर्वत्र कौतुक होत असे.

नानांचा व्रतबंध (मुंज) १७४६ साली झाला. त्याकाळी लवकरच लग्न करण्याची पद्धत होती. त्यामुळे त्या काळच्या रितीरिवाजाप्रमाणे त्यांचे लग्न वयाच्या दहाव्या वर्षीच झाले. पुढे त्यांना मुले जगत नसल्याने, पत्नी जगत नसल्याने किंवा अन्य कारणांमुळे अनेक लग्ने करावी लागली.

## राजकीय कर्तृत्व

नानांच्या वडिलांचा अचानक मृत्यु झाल्यामुळे त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली. त्यांचे वयही फार मोठे नव्हते, वयाच्या १५ व्या वर्षीच त्यांना फडणवीशीची वस्त्रे मिळाली. पहिलेपासूनच पेशवे व फडणवीस एक दिलाने काम करीत असत. नानांची हुशारी आणि कर्तव्यनिष्ठा पेशव्यांनी बरोबर हेरली होती. त्यांच्यावर पेशव्यांची विशेष मर्जी होती.

१७६१ साली पानिपताचे युद्ध झाले.

युद्धासाठी पेशव्यांबरोबर स्वतः नानाही गले होते. त्यांचे सोबत त्यांची पत्नी





आणि आई या दोघीही होत्या या युद्धात मराठ्यांना हार खावी लागली.

अतोनात नुकसान झाले. बरेच शूर योद्धे कामी आले. खूप पळापळ झाली. नाना, त्यांची आई तसेच पत्नी सर्वांची ताटातूट झाली. सर्वजण जीव मुठीत घेऊन जमेल तिकडे पळाले. अत्यंत कठीण परिस्थितीतून नाना कसेबसे वाचले. बरेच प्रयत्नांनतर त्यांची पत्नी सापडली मात्र आई सापडली नाही तीचा त्यांनी खूप शोध घेतला पण पुढे ती गेल्याचेच कळले. त्यांचा आईवर फार जीव होता त्यांना अतीव दुःख झाले. वयाच्या अवघ्या २० व्या वर्षीच नानांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. कित्येकदा प्राणांतिक संकटातून ते वाचले. अनेक चांगले-वाईट अनुभव त्यांना आले.

तो काळ नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीचा होता. त्यांच्या, तसेच अनेक शूर, मुत्सद्दी, हुशार सरदारांच्या सान्निध्यात नानांना खूप काही शिकायला मिळाले. पुढे थोरल्या माधवराव पेशव्यांच्या काळात त्यांचा सर्व कारभार अत्यंत विश्वासाने नानांनीच सांभाळला. त्याच काळात राघोबादादा व माधवराव पेशवे यांच्यात प्रथमपासून असलेली दूही वाढतच गेली. पुढे त्याचे पर्यवसान नारायणराव पेशवे यांच्या खुनात झाले. तो काळ १७७३ चा होता. त्या सुमारास राघोबादादांनी पेशवेदासाठी बऱ्याच कारवाया केल्या.

नारायणरावांच्या खुनानंतर, त्यांच्या पत्नी प्रसुत होऊन त्यांना पुत्ररत्न झाले त्यांचे नाव सवाई माधवराव पेशवे असे ठेवले. बहुत खटपट करुन नानांनी त्यांच्यासाठी सातारच्या महाराजांकडूनू पेशवाईची वस्त्रे मिळवली. त्यावेळी त्यांचे वय अवघे ४० दिवसांचे होते. सवाई माधवरावांना पेशवेपदावर बसवून नानांनी त्यांचेमार्फत कारभार करण्यास सुरवात केली. सर्व जनतेचा पाठिंबा याकामी नानांना मिळाला. याच वेळी अनेक सरदारांनी त्यांना सहकार्य केले व पुढे सर्व कारभार नानानी अत्यंत कुशलतेने सांभाळला. त्यांनी अनेकांच्या सहकार्याने जुळवलेले बारभाईचे कारस्थान यशस्वी झाले.

यावेळेपर्यंत हिंदुस्थानात इंग्रज व फ्रेंचांचा शिरकाव झालेला होता. अवघ्या हिंदुस्थानावर राज्य करण्याच्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न चालू होते त्यांच्या सर्व कारवायांवर नानांची बारीक नजर असे. सर्वत्र नानांचा दरारा होता. त्यामुळे सवाई माधवराव पेशव्यांचा कालखंड वैभवाचा होता, प्रजा सुखी समाधानी होती. राज्यकारभार सुव्यवस्थित चालला होता. पुढे सवाई माधवरावांनी आत्महत्या केली. या गोष्टीचे नानांना फार दुःख झाले. यानंतर दुसऱ्या बाजीरावास पेशवेपद मिळाले. बाजीराव व नाना या दोघात सामंजस्य नव्हते. बाजीरावांच्या मनात नानांविषयी द्वेषाची भावना होती. बाजीरावांनी उतरत्या वयात नानांना कैदेत ठेवले त्यांची मालमत्ता जप्त केली. त्यांची प्रकृती खालवली ज्वरामुळे प्रकृती बिघडत गेली. आजारी होऊन त्यांनी अंथरुणच धरले. पुढे फाल्गुन वद्य सन १८०० साली त्यांचे देहावसान झाले. त्यांचे नव्हे तर जणू स्वराज्याचाच अंत झाला. इंग्रजांचे वर्चस्व वाढले.

नाना गेल्यानंतर त्यांची शेवटची पत्नी जी हयात होती, तिला वैधव्य आले. त्यांचे नाव जिऊबाई असे होते. त्या वयाने फार लहान होत्या. त्यांना फार त्रास सहन करावा लागला पण न घाबरता खंबीरपणे त्या उभ्या राहिल्या नानांची सर्वच इस्टेट जप्तीत होती काही काळ पुण्यात राहून नंतर त्या लोहगडाच्या आश्रयाला जाऊन राहिल्या. तेथे श्री वैशंपायन श्री नित्सुरे यांनी त्यांना खूप मदत केली. नानांनी अनेक ठिकाणी वाडे बांधले होते. त्यापैकी मेणवली गावी असलेला वाडा जिऊबाईंना सुरक्षित वाटला असावा कारण जप्तीतून स्थावर मिळकत सुटल्यावर त्या याच वाड्यात येऊन राहिल्या. पुढे बेलबाग संस्थानही जप्तीतून मोकळे झाले. यासाठी जिऊबाईंनी इग्रजाशी बराच पत्र व्यवहार केलेला आढळतो.

स्वकतृत्वाने, अक्कल हुशारीने आणि मेहनतीने नानांनी भरपूर उत्पन्न मिळविले होते. खुद्द पेशव्यांकडून अनेक गावे त्यांना इनाम मिळालेली होती.





याशिवाय निजाम सिद्दी यांच्याकडूनही त्यांना बक्षिसी व इनामे मिळाली होती. नानांना जेथे जेथे इनामे मिळाली होती त्यातल्या अनेक ठिकाणी त्यांनी देवालये, घाट, वाडे बांधले, जागोजागी वाटसरुंसाठी पाणपोया, , पाण्याचे नळ, विहिरी बांधून त्यांची सोय केली. धर्मशाळा व अन्नछत्रे उभारली. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली. नानांनी बांधलेले वाडे, घाट, मंदिरे धर्मशाळा यांची भलीमोठी यादीच आहे. पैकी काही ठिकाणे येथे देत आहे.

१) काशी क्षेत्री दुर्गाघाटावर एक व भैरोबाचे देवळापाशी एक असे दोन मोठे वाडे बांधले. उत्तर हिंदुस्थानात कर्मनाशा नदीवर पूल बांधला.

२) वेळास येथे भैरोबाचे देऊळ बांधले

३) वेरुळ जवळील वारी येथे (जि. औरंगाबाद) मोठा सभोवार तटबंदी असलेला वाडा बांधला.

४) कायगाव टोके येथे मोठा वाडा व तेथील गोदावरी नदीला घाट बांधला.

५) कोपरगाव तालुक्यात एक वाडा व घाट बांधला.

६) खोपोली येथे शंकराचे मंदिर व एक मोटा तलाव बांधला. तेथेच लोकांसाठी धर्मशाळाही बांधली.

७) स्वतःला राहण्यासाठी शनिवार वाडयाच्या जवळच एक सुंदर विस्तीर्ण वाडा बांधला. हा वाडा नानावाडा म्हणून प्रसिद्ध आहे.

८) पुणे येथे बऱ्याच पेठा वसवल्या - गणेशपेठ, नाना पेठ, सदाशिव पेठ इत्यादी

९) पुणे येथील सदाशिव पेठमधील लोकांना पाणी मिळावे म्हणनू नऱ्हे-आंबेगाव येथून भूमिगत खापरी नळ टाकून पाणी आणवले व तेथे दोन मोठे हौद बांधले. पुणे येथील सदाशिव पेठेतच दोन मोठे वाडेही बांधले.

१०) बेलबाग पुणे येथे श्री विष्णु-लक्ष्मीचे मोठे देवालय बांधले हे देवायल आता लक्ष्मी रस्त्यावर आहे. देवळाचे सर्व काम लाकडी व कोरीव आहे. बेलबागेचे परीसरातच दोन मोठे वाडे बांधले.

श्रीभवानराव त्र्यंबक पंतप्रतिनिधी, श्रीमत माधवराव पेशवे, श्री. घनश्याम मंत्री यांजकडून मेणवली हा गाव इनाम मिळाला.

**वाई मेणवली आणि परिसराचे आध्यात्मिक व पौराणिक महत्व**

बाई ही नगरी व परिसर तसा प्राचिन, त्याला पौराणिक म्हणजे महाभारत पूर्व कालापासून महत्व आहे. महाभारतातील विराट राजाच्या स्वामित्वा खालील हा भाग विराट नगरी म्हणूनही वाईचे महात्म्य आहे. वैराट गड, पांडवगड, मांदार देव अशा पौराणिक महत्वाच्या ठिकाणांनी वेढलेला हा परिसर, त्यातच धौम्य ऋषींच्या तपोवनाचा व आश्रमाच्या खुणा सांगणारा, निरनिराळ्या श्रेष्ठ अशा तापसाच्या वास्तव्याने पावन झालेला दक्षिणगंगेचा म्हणजे श्रीकृष्णा काठचा हा निसर्गसुंदर, स्वर्गीय शांतता प्रदान करणारा परिसर, श्री नानांच्या एकांतप्रिय मनाला अतिशयच भावला असणार म्हणूनही नानांनी वास्तव्यासाठी सुंदर वास्तुची व श्रीगंगास्नानासाठी भव्य, प्रशस्त अतिसुंदर अशा घाटाची निर्मिती केली असावी.

## भौगोलिक स्थिती व राजकीय महत्व

वाई म्हणजे वई याचा अर्थ सीमा किंवा कुंपण असा होतो. वाई हे सातारा जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण आहे. कोकण किनाऱ्यावरून इंग्रजाचे देशावरील लोकांकडे जाणेयेणे व देशावरील लोकांचे कोकणात इंग्रजांकडे जाणेयेणे होत असे. यावर देखरेख ठेवता यावी म्हणनूही कदाचित नानांनी याठिकाणाची निवड करून ते मागून घेतले असावे.

हा वाडा सुमारे दीड एकर परिसरात पसरलेला आहे. वाडयास चहबाजूनी उत्तम तटबंदी आहे. वाडा कृष्णेच्या काठावरच आहे. वाड्याचे प्रवेशद्वार हे





उत्तराभिमुख आहे. नीट अवलोकन करता वाड्याची रचना गोमुखी प्रमाणे दिसते. तिचा उद्देश असा की, हातात शस्त्र आहे कि जपमाळ हे बाह्यस्वरूपावरून काही कळू नये. उत्तराभिमुख दरवाजावरच नगारखाना आहे. प्रवेश द्वाराजवळच द्वारपालासाठी देवडी आहे. दरवाजाच्या लगेच आत पहारेकऱ्यांसाठी डाव्या हातास जागा असून तेथे वेळ कळावी म्हणून वाळूचे घडयाळ व टोल देण्यासाठी तास टांगलेला असे. पूर्वी त्याच्या शेजारीच मोराचा मोठा पिंजरा होता त्याच्या जवळच्याच खोलीत तांबटाचे वास्तव्य असे. प्रवेशद्वार ओलांडून आत आल्यावर लगेचच वाड्याचा पहिला चौक येतो. चौकाचे उत्तरेस कचेरी असून दक्षिणेस भाताचे बळद होते. चौकाचेपुढे जोत्याच्या तीन पायऱ्या चढताच ओसरी आहे. ओसरीचे डाव्या अंगास प्रशस्त देवघर आहे.

वाड्यास एकूण सहा चौक आहेत. पहिला चौक सोडल्यास उत्तरेस विहीरीचा चौक आहे. ही विहिर खोल बांधिव असून पाणी चवदार आहे. दक्षिणेस कारंजाचा चौक आहे. चौकाचे मध्यभागी दगडी बांधकाम केलेले मोठे कारंजे आहे. त्यास पूर्वी **हळदिकुंकवाचा चौक** म्हणत असत. पूर्वी येथे बायकांचे कार्यक्रम चालत. येथील ओसरीचे खांब कोरीव आणि सुंदर असून सुंदर भित्तिचित्रे आहेत मात्र ही चित्रे आता फिकी झालेली दिसतात.

नैऋत्य दिशेस स्वयंपाकाचा चौक आहे. तेथील काही भाग पडला आहे. वास्तुपुरुषाच्या नाभीस्थानी मधला चौक आहे. वायव्येस कांजणसाळीचा अथवा तुळशीवृंदावनाचा चौक आहे. अजूनही तेथे तुळशीवृंदावन आहे. वाड्याच्या मध्य चौकातील पश्चिम दरवाजातून बाहेर पडताच दोन्ही बाजूस नोकरचाकर, दुभती जनावरे, यासाठी ओसऱ्या आहेत. तेथील दरवाजा ओलांडताच वाड्याचा परसभाग येतो. तेथेच वायव्येस अखिव बाग असून तुळशीवृंदावन असलेला दगडी बांधकाम केलेला मोठा ओटा आहे. त्याच्या शेजारील फरसबंद भागातून पूढे गेले की पश्चिम दरवाजा आहे. तो नदीकडील घाटाकडे उघडतो.

वाड्याचे सर्वच बांधकाम वैशिष्ट्यपूर्ण आहे. वाडा चिरेबंदी, दुमजली आणि पूर्ण तटबंदी असलेला आहे. हा वाडा म्हणजे वास्तुशास्त्राचा एक उत्कृष्ठ नमुनाच आहे. यातील चौक हे या वास्तूला पश्चिमेकडून व उत्तरेकडूनही

भरपूर ताज्या हवेचा पुरवठा करतात. त्याचबरोबर या देखण्या वास्तूला भरपूर सूर्यप्रकाशही पुरवतात. वाड्यातील भिंती रुंद व मजबूत असून भिंतीतूनच जिने काढलेले आहेत. भिंती माती, चुना इत्यादीचा वापर करून बांधल्या असाव्यात. वाड्यातील खांब, तुकड्या, लगी तसेच छत सर्व सागवानी उत्तम लाकडाचे आहेत.

वाड्यातील मधले तीन्ही चौक फरसबंद असून फरसबंदीत वेगळे वैशिष्ट्य राखून आहेत. मधल्या चौकात शंभर एकसारखे ताशिव चौरस फरस (दगड) सुबक रितीने व कौशल्याने बसवलेले आहेत. प्रत्येक चौकात या फरसाखाली दोन फूट विटांनी बांधलेले उत्तम गटार आहे. दोन फरसांमधील सांधे हेतुत:च दरजा न भरलेले आहेत. त्यावर पडणारे पावसाचे पाणी दोन दगडांमधील फटीत झिरपून खाली विटांनी बांधलेल्या गटरात उतरावे हा त्यामागील उद्देश आहे.

दुसरे मजल्यावर मुख्य दरवाज्याच्या वरच मोठा दिवाणखाना आहे. येथील खांब कलाकुसर केलेले आहेत. छताचे काम लाकडी व कोरीव आहे..

आतील बाजूस एक खोली असून तेथे नानांचा संपूर्ण कोरीव काम केलेला शिसवीचा मोठा पलंग आहे. याच मजल्यावर पश्चिमेकडील बाजूस चित्रांची खोली आहे. ही चित्रे वाड्याएवढीच जुनी आहेत सर्व चित्रे रंगीत असून त्यात रामपंचायतन, कृष्ण व अष्टनायिका, शेषशाही भगवान विष्णू, शिव आणि त्यांचे पार्षद, महिषासुर मर्दिनी, दशावतार यांचा समावेश आहे. ही भिंतीचित्रे म्हणजे मराठा चित्रशैलीचा एक उत्कृष्ट नमूनाच होय.

याच खोलीतील गवाक्षातून व त्याच्या शेजारील खोलीतील गवाक्षातून (खिडकी) कृष्णानदीचे पात्र, घाट आणि मंदिरे यांचे मनोहारी दर्शन घडते. येथून तो सर्व परीसर अतिशय सुंदर दिसतो. या सर्व बारीकसारीक गोष्टींमधून नानांची रसिकता, सौंदर्यदृष्टी दिसून येते.





## कृष्णा नदीचा घाट

सुयोग्य जागा बघून नानांनी चंद्रकोर आकाराचा घडीव दगडांचा घाट बांधला आहे. घाटाचा मध्यभाग मोठा असून कासवाचे पाठीच्या आकाराचा आहे. त्यामुळे यास कासव घाट असेही म्हणतात. संपूर्ण घाटाला उत्तरेकडील बाजूस उंच आणि मजबूत तगडी भिंत बांधली आहे. पावसामुळे उंचावरील माती वाहून घाटावर अथवा नदीतील डोहात येऊ नये हा त्यामागील उद्देश असावा. या भिंतीत लहान लहान कोनाडे करून पणत्या लावण्याची सोय केली आहे. रात्रीच्या वेळी त्यात सर्वत्र दिवे लावल्यास तेथील दृष्य अप्रतिम दिसते. नदीच्या सौंदर्यात आणखीच भर पडते. या संपूर्ण घाटावर दोन मोठे पिंपळपार बांधलेले आहेत. त्याची बांधणी वैशिष्ट्यपूर्ण असल्यामुळे त्याची भव्यता उठून दिसते.

## कृष्णेच्याकाठची देवळे

पश्चिमेकडील बाजूस नानांनी बांधलेले वासुदेव लक्ष्मीचे मोठे मंदीर आहे. शेजारीच अमृतेश्वराचे (शंकराचे) मंदीर आहे. दोन्ही मंदिराचे कळस रेखीवही आहेत. शंकराचे मंदीराच्या समोर घंटेचेही छोटेसे मंदीर बांधले आहे. ही घंटा चिमाजीअप्पांनी जिंकून आणलेली होती. ती पंचधातूची असून घेर मोठा व वजनदार आहे. वासुदेवाचे मंदीरासमोर धर्मशाळा आहे. ही साधुसंताना राहण्यासाठी असावी.


नानांनी बांधलेला वाडा आणि घाट याचा त्या काळातला खर्च अंदाजे १।। लाख रुपयापर्यंत असावा असा उल्लेख आढळतो. अनेक ठिकाणी त्यांनी वाडे, देवालये, घाट, धर्मशाळा, पाणपोया बांधल्या, आजही त्यातल्या काही वास्तु नानांच्या कर्तृत्वाच्या खुणा जपत उभ्या आहेत. नानांनी बांधलेला मेणवलीचा वाडा तर उत्कृष्ट बांधकामाचा नमुनाच आहे. नानांचे आताचे वंशज आजही तेथे राहात आहेत आणि निष्ठेने व अभिमानाने आपल्या या थोर पूर्वजांच्या खुणा जतन करताना दिसत आहेत. मेणवली व बेलबाग या दोन्ही वास्तु त्यांनी उत्तम

प्रकारे जतन केल्या आहेत.

नानांची एकूण सर्वच कारकीर्द भारदस्त व उत्तुंग अशीच होती. त्यांचा अत: काळ मात्र फारसा चांगला गेला नाही. १८०० साली फाल्गुन वद्य तृतीयेस त्यांनी देह ठेवला. नानांबरोबरच स्वराज्याचे शहाणपण लयास गेले.

श्रीमंत नाना फडवणीसांची वंशवेल नानांना दोन मुलगे झाले होते पण ते अल्पायुषी ठरले. त्याचा दत्तकपुत्रही लवकरच चारला अखेरीस त्याच्या पत्नी जिऊबाई यांनी वाई मिरजेचे रामकृष्ण गंगाधर भानू यांचा मुलगा दत्तक घेतला. त्यांचे नाव महादजी होते.

## श्रीमंत नाना फडवणीसांची वंशवेल








नाना फडणवीस पुणे येथे नाना वाड्यातच वास्तव्यात असत. (नाना वाडा म्हणून आजही ओळखला जातो.) राज्यकारभारातून फुरसत मिळाल्यास कधी कधी ते त्यांनीच बांधलेल्या मेणवली येथील वाड्यात येत असत. इंग्रज लेखकांनीही नानांविषयी गौरवोद्गार काढले आहेत. नानांची वागणूक शांत, शिस्तशीर प्रामाणिक तसेच असल्याने ते म्हणतात.

नाना फडणीस म्हणजेच बाळाजी महत्त्वाच्या घटना, त्यातील त्यांचा सहभाग, त्यांचे मुत्सद्दीपणा व चातुर्य, त्याचबरोबर मराठा स्वराज रक्षणाची त्यांचेशी महत्त्वाचा व्यक्तींनी केलेल्या पत्रव्यवहार व त्यांनी महत्त्वाच्या व्यक्तींशी केलेला पत्रव्यवहार, महत्त्वाच्या लोकांनी त्यांचे संदर्भात व्यक्त केलेली मते या सर्वांचा अल्पशा गोषवारा शकावलीमध्ये पुढे सादर करीत आहोत.

# नाना फडणवीस संक्षिप्त शकावली

श. १६४१ श्रावण वद्य १३ भानुवासर ६ १७१९ अगष्ट २ (राजशक ४१ (४६) सु. ११२० रमजान २६) शाहू छ० सी सनद रामाजी महादेव व जनार्दन बल्लाळ भानू यांस नाणे मावळ पंकी वाकसई हा गांव बाळाजी महादेवाचे आहे बाळाजी विश्वनाथ प्रधान यांज बरोबर दिल्लीतील स्वारीत असता युद्धप्रसंगों जसमा लागोन मृत्यु पावले, सबब इनाम दिला. (इ. सं. पे. द. स. मा. पु. १७४)

(१६६३ माघ वद्य ४ शुक्रवार) इ. १७४२ फेब्रु. १२
सातारा येथे बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणवीस यांचा रात्री १० वाजता जन्म. कुंडली-केळकर यांचा राजा संग्रहफ; नानांचे च. पू. ६-७ १.

१६७३ .... इ. १७५२ नानांचा पहिला विवाह वय १० (गद्रे यांची कन्या यशोदा) काव्य. सं. आत्मच. ले. १९२

१६७८ ळ. १७५६
नानांचे वडील जनार्दनपंत यांचा उत्तर हिंदुस्थानांत स्वारीवर ।। असतां मृत्यु ना. च. पू. १०

-''- भाद्रपद शु. ६ इ. १७६० सप्टें. १५ (सफर ५)
नाना इंद्रप्रस्थ = दिलीहून चुलते बाबुराव यांस तिकडील संन्यवृत्त कळवितात. सुजा लबाड, आपल्या सैन्याची हलाखीफ पोटाचें संकट इ. इ. ( पे. द. २ ले. १३१)

-''- फागुन १०.इ. १७६१ मार्च २१ सावान २३) हरिपंत फडके यांस शिरोज मुकाम पान लास (गेले कोणकोणती यादी) श्रीमंत नानासा० माधारे फिरले हे चुकले आपण टोक्यात राहू अत:पर चाकरी नको. द. १ ले. ४१७)

-''- -आषाढ शु. ७. १७६१ जुलै ८ (जिल्हेज ५)
विजयदुर्गाहून दादो हरी मानांना लिहितो र वर्तमान नानास मृत्यु ॅअवतार समाप्त झाल्याचे आले; शोकार्णवों पडलो. आपण स्वाक्षरातर्वर्णे संजोय करणार वाद आहेत. (पे. ब. २. १४०)

१६८३ -पिता जनार्दन माता रुक्मिणी यांचा पुत्र बाळाजी (नाना फडणीस) भानु ह्यांनी गोदावरी नदी काठी कायगांव हमा क्षेत्र श्री सिद्धेश्वर प्रसादार्थ घाट बांधला. (संस्कृत दोन शिलालेख ऐ. सं... ५.५ (संवत्सर इ. १७६१)) (जन्म पति आईचें नांव रखमाबाई' असें दिले आहे. शिलालेखांत श्लोक-रचनेसाठी रुक्मिणी' हें नांव आले असावे.)

-''- - फाल्गुन शु।। १२ इ. १७६४ मार्च १५ (आर्बा रमजान ११) माधवरावसाहेबांनी नानांस सरकारचे वाडाभोवती आपापले ठिकाण छपरे घालून राहतील त्यास राहू द्यावे. नयी मातबर इमारत व खरेल नय. ज्या पबित पाहिर्त असू द्यावी. स्वारी पुण्यास आलिया- पर आज्ञा करणें ते करूँ, फसव्यांत फार करून वतनदार आहेत. ( पे. ब. ३९ से. २६)

-''- भाद्रपद शु ८ इ. १७६४ सप्टें. ३ (सु. ११६५ रवल ६) माधवराव नाना फडणविसांस कळवितात, १७३४ तोफांच मोळे, १।। खंडी शिसे, १ खंडी १ मण दास, पुनः २५७१ गोळे, ८ खंडी दारू व २ ।। शिसे पाठविले ते मिरज येथून लष्करात येतील. पण वसईहून विसाजी केशवाकडे एक नेह- मींचा कारकून ठेऊन दारुगोळा आणवून त्यास नवी पुढे तयार करवून तो रवाना करणे. पुण्याच कारखाना चालीस लाऊन नवी दाल करून वरचेवर


श्रीमंत नानांचा वाडा

पाठविणे. भाद्रपदांत पोचेसे कपडे पाठविणे. (पे. द ३९ . ३७)

-''- - कार्तिक शु. १५ इ. १७६४ नोवें. ८ (सु. ११६५ जवल १३) थो. माधवराव नानांना पुण्यास पत्र पाठवून ३० खंडी दारू व बाण तयार होतील तितके मागवितात. (पे. द. ३७ ले. ५४)

श. १६८६ पौष शु. १३ इ. १७६५ जाने. ५ (सु. ११६५ रजब १२) बाळाजी जनार्दन फडणीस यांजकडे मौ० घोटवडे (तर्फ आय आधारणे) हा गांव पूर्वी प्रमाणे आहे. पण साल मजकुरा पुरतें ह्या गांवचें पीक मात्र नरसी रघुनाथ पाजला देऊन त्याचे पैशाची फेड माधवराव पंतप्रधान यांनी केली. (भानुफडणीस बेलबाग संस्थान संग्रह अप्रसिद्ध कागद)

-''- फाल्गुन शुद्ध ३ इ. १७६५ मार्च २४ रमजान १) नाना गोपिकाबाईंना लिहितात, गुदस्तां पुणे जाळल्यामुळे रावसाहेब पुण्यास न आले. यास्तव पुण्याची वस्ती यथास्थित न जहाली. फुटकी आहे. तशांत समीप पुरंदरचा दंगा दहशत खाऊन लोक तजावजा. पण नारायणराव आल्यामुळे लोक घोर धरून घरे बांधू लागले, अशांत आपण नारायणरावांस बोलावता. तेव्हां लोकांस धीर पुरोन गांवची भरवस्ती होईल म्हणून पाठवू नये. आपणच येथें यावें. रावसाहेबांची पत्र की, लष्करांत पंका नाहीं तो पाठवा. (ऐ. ले. सं. ३ ले. ५६० )

१६८७ कार्तिक शु. २ इ. १७६५ आक्टोबर १६ (रखर २०) नानांनी ४ ला. २७ ह. च्या हुंडयापकों २७ ह. चें ठिकाण लावावें असें माधवरावांस लिहिलेवरून माधवराव सर्व हिशेब कळवितात व २७ है. चा भरणा करावा हें सुचवितात (पे. द. २० ले. १५५)

-''- -मार्ग. शु. ५ इ. १७६५ नव. २७ (सु. ११६६ जखर १३) नाना फडणीस यांजकडे मौजे घोटवडे (प्रा पाली) येथील खोती आहे. म्हणून सिलेदार व रहदारीच्या लोकांस माधव- रावांनी बजाविलें आहे की हया गांवात जातां येतां हजर बेगारीचा वगैरे उपसर्ग न





लावणे.(भानूफड० बेलबागसंस्थान संग्रह अप्र. कागद)

-''- फाल्गुन वद्य १० इ. १७६६ मार्च ६ (सु. ११६६ रम. २४) नानांना किल्ले देहरसानी येथील सबनिशीकडील फडणिसी सांगितली. (थो. मा. रो. १ पृ. ४१)

श. १६८८ अ. चैत्र वद्य ३ इ. १७६६ मार्च २९ सु. ११६६ (सवाल १७) पुण्यांत विष्णूचें देवालय करून लहानशी पुष्यवाटिका करावी व त्यासाठी बुधवारांत मानाबाईची जागा रिकामी तो त्यांच्या संतोष घेऊन देवालयास काम लाविलें.

-''- -अ. चैत्र वद्य ८ इ. १७६६ एप्रील ३ (सु. ११६६ सवाल २२) नाना फडणविसांनों बाबूजी नाईक बारामतीकर ह्यांस त्यांनी हैदराशीं कारस्थान केलें, प्रतिनिधीबाबत खोटेपणा केला, हचाबद्दल, मुलामाणसांसह पकडून त्यांची घोडी, दागिने आणविली ती याद (पे. द. ३७ ले. ९५, ९९; ऐ. ले. सं. ३ ले. ६४१)

-''- -चैत्र शु १४ इ. १७६६ एप्रील २३ (सु. ११६६ जिलकाद १३ पोंच)

नाना विषय माधवरावांचा आपलेपणा व नानांची दिनचर्या श्रीमंत म्हणतात नानाचे पुण्य अधिक. उन्हाला आळस चालढकल माहीत नाहीं. स्नान संध्या करतात. प्रातःकाली स्नान, प्रहर दिवस पर्यंत देवपूजा, तदोत्तर दोन प्रहरपर्यंत कारभार. मग भोजन, नंतर घटकाभर कारभार. मग चार घटका निद्रा, फिरोन संध्याकालपर्यंत कारभार, तदोत्तर संध्या. नंतर पुराण मध्यरात्र नित्य निजावयास होते. श्रीमंतांची नित्य संतोष मर्जी समय गोष्ट निघाली तर 'ये समयी नाना काय करीत असतील' असे श्रीमंत विचारतात. परंतु परित्य गोष्ट मुखांतून कधीहि ऐकण्यांत आले नाहीं. असें असता, ४ नानावर यख्तियार टाकला त्यामुळे गर्व फार जाला. विद्या माडीवरून खाली खालून वर टाकाव्या, वाल्याचे पडदे'

अशा गोष्टी कधी निघाल्या नाहींत. एकान्तो ज्या जवळ श्रीमंत बोलले त्या प्रामाणिकानेंच स्वामिजवळ सांगितल्या हॅ श्रीहरी जाणें. श्रीमंतांचा विश्वास कांहीं आहे तो आपले ठाई, असें कोहि बोलण्यांत दिसतें. पे. व. ३९ ले. ६१

-''- -माघ वद्य ९ इ. १७६७ फेब्रु. २३ सु. ११६७ रमजान २३ नानांनी वे. रा. मोर जोशी यांजकडून पद्मपुराणाचे (मधील) . गणपतीसहस्रनाम लिहून घेतले. (पे. द. ३२ ले. ३७)

१६८९ चैत्र शु. १५ इ. १७६७ एप्रील १४ (जिलका १४) माधवराव प्रधान नानांना कर्नाटकातील स्वारीत मुलूख सुटला किती (३० ल.) राहिला कोणचा (जगदेव सरकार), खंडण्या व ५८ ल. कर्ज किती घेऊन खर्च चालला. एक हैदरची मामलत राहिलो. पण दिवस शेवटचे आले. अशा संबंधी कळवून २५ ल. पत्र. व्य. ले. १०८ रु. मागवितात (भा. व. ऐ. पत्र. व्य. ले. १०८)

१६८७ कार्तिक शु. २ इ. १७६५ आक्टोबर १६ (रखर २०) नानांनी ४ ला. २७ ह. च्या हुंडयापैकी २७ है. चें ठिकाण लावावें असें माधवरावांस लिहिलेवरून माधवराव सर्व हिशेब कळवितात व २७ है. चा भरणा करावा हें सुचवितात. (पे. द. २० ले. १५५)

-''- -मार्ग. शु. ५ इ. १७६५ नव. २७ (सु. ११६६ जखर १३) नाना फडणीस यांजकडे मौजे घोटवडे (प्रा पाली) येथील खोती आहे. म्हणून सिलेदार व रहदारीच्या लोकांस माघव- रावांनी बजाविलें आहे की हया गांवात जातां येतां हजर बेगारीचा वगैरे उपसर्ग न लावणे. (भानूफड० बेलबागसंस्थान संग्रह अप्र. कागद)

-''- फाल्गुन वद्य १० ६. १७६६ मार्च ६ (सु. ११६६ रम. २४) नानांना किल्ले देहरसानी येथील सबनिशीकडील फडणिसी सांगितली (थो. मा. रो. १ पृ. ४१)

श. १६८८ अ. चैत्र वद्य ३ इ. १७६६ मार्च २९ सु. ११६६ (सवाल १७)





पुण्यांत विष्णूचे देवालय करून लहानशी पुष्यवाटिका करावी व त्यासाठी बुधवारांत मानाबाईची जागा रिकामी ती त्यांच्या संतोष घेऊन देवालयास काम लाविलें.

(श. १६८८ अ. चैत्र) द्यावयाची नव्हती. परंतु तुमचे भिडेस्तव देणें प्राप्त. ही पास्तव ठेवली होती. बरें, आतां तुम्ही करता हैंहि उत्तम. (भानु फडणीस बेलबाग सं. हस्तलिखित संग्रह अप्र. हें बांध- काम चालले होते. भा. वर्षांत आलेली श. १६८७ तील गोदामुळे चित्य वाटते.)

-''- -अ. चैत्र वद्य इ. १७६६ एप्रील ३ (सु. ११६६ सवाल २२) नाना फडणविसांनी बाबूजी नाईक बारामतीकर ह्यांस त्यांनी हैदराशी कारस्थान केले, प्रतिनिधीबाबत खोटेपणा केला, पाबद्दल मुलामाणसांसह पकडून त्यांची घोडी, दागिने आणविलो तो याद (पे. द. ३७ ले. ९५. ९९ ऐ. ऐ. सं. ३. ६४१)

-''- -चैत्र शु. १४ इ. १७६६ एप्रील २३ (सु. ११६६ जिलकाव १३ पोंच)

नाना विषयीं माधवरावांचा आपलेपणा व नानांची दिनचर्या श्रीमंत म्हणतात 'नानाचे पुण्य अधिक. उन्हाला = आळस चालढकल माहीत नाहीं. स्नान संध्या करतात. प्रातःकाली स्नान, प्रहर दिवस पर्यंत देवपूजा, तदोत्तर दोन प्रहरपर्यंत कारभार, मग भोजन, नंतर घटकाभर कारभार. मग चार घटका निद्रा फिरोन संध्याकालपर्यंत कारभार तदोत्तर संध्या: नंतर पुराण मध्यरात्र नित्य निजावयास होते. श्रीमंतांची नित्य संतोष मर्जी समय गोष्ट निघाली तर 'वे समयो नाना काय करीत असतील' असे श्रीमंत विचारतात. परंतु परित्य गोष्ट मुखांतून कधीहि ऐकण्यांत आले नाहीं. असें असता, 'नागावर परियार टाकला त्यामुळे गर्व फार जाला. चिटद्या माटीवरून खाली खालून वर टाकाव्या, बाल्याचे पडदे; ' अशा गोष्टी कधी निघाल्या नाहीत. एकान्ती ज्या जवळ श्रीमंत बोलले

त्या प्रामाणिकानेंच स्वामिजवळ सांगितल्या है श्रीहरी जाणे. श्रीमंतांचा विश्वास कांहीं आहे तो आपले ठाई, असे कोठेहि बोलण्यांत दिसतें. (पे. व. ३९ ले. ६१)

-''- – माघ वद्य ९ इ. १७६७ फेब्रु. २३ सु. ११६७ रमजान २३ नानांनी वे. रा. मोर जोशी यांजकडून पद्मपुराणाचे (मधील) गणपतीसहस्रनाम लिहून घेतले. ( पे. द. ३२ ले. ३७)

-''- १६८९ क्षेत्र गु. १५ इ. १७६७ एप्रोल १४ (जिलकाद १४) माधवराव प्रधान नानांना कर्नाटकांतील स्वारीत मुलूख सुटला किती (३० ल.) राहिला कोणचा (जगदेव सरकार), खंडण्या व ५८ ल. कर्ज किती घेऊन खर्च चालला. एक हैदरची मामलत राहिलो. पण दिवस शेवटचे आले. अशा संबंधी कळवून २५ ल. रु. मागवितात (भा. व. ऐ. पत्र. व्य. ले. १०८)

श. १६८९ आश्वीन वद्य १२ इ. १७६७ आक्टो. १९ (सु. ११६८ जबल २५)

बालाजी जनार्दन भानु महाजन वेळास यांस भगवंतराव त्र्यंबक प्रतिनिधींनी मौजे येणेगाव तर्फ उबरज प्रांत कन्हाड- हा गांव, तेथील जिल्हेवा खालसा अमल व स्वराज्य निमे व मोकासा बिजाई वसंतगडा बाबत व महाल मजकूर व इतर बाब व साहोत्रा पासदाणा व स्वारोपटी व इनामतिजाई इत्यादि सर्व हक्क उत्पन्नांसह श्रीविष्णु-पुणे पेठ बुधवारच्या पूजा नेवेद्याच्या वेगमीसाठी दिला. तो भातूंच्या विद्यमाने चालावयाचा. आहे. (फडणीस भानू बेलबाग संस्थान संग्रह अप्र. का)

-''- माघ शु १५३. १७६८ फेब्रु. २

विश्वासराय दाशी राजेबहाद्दर यांस पुण्याहून बाळाजी शंकर लिहितो -पुणे दरबारों फडणिसांचे वळण भारी. नाना फडणीस यांजवर सर्व यकत्यार आहे. त्यांनी सांगावें तें प्रमाण (पे. द. २९ ले. २००)

-''- -कार्तिक वद्य १४ इ. १७६८ डिसें. ८ (तिसा रजब २७ पा)





माधवराव प्रधान नानांना पंढरपूर येथे आल्याचें व सुरापुरास जाणार असल्याचे कळवून. नागपूरकर भोसले यांजकडील देवाजीपंत येईल तरी दो तिहीं तऱ्हेनें बातमी राखण्याबद्दल बजावितात. (ऐ. पत्रव्य. ले. ११५ पुस्तकांत वद्य १० व ता. ३ पडली आहे)

श. १६९० मार्ग. शु. १० इ. १७६८ डिसें. १९ (शक, सर्वधारी सु. ११६९ सावान ९)

नाना फडणीस महाजन वेळास यांना रघुनाथराव घनःशाम मंत्री यानी मेणोली गांवचा आपला खालसा अमल, स्वराज्य देखील सावोत्रा नाडगौडकी हे हक्क जे रात्रपत्री इनाम आहेत ते दिले. (भानुफडणीस संस्थान बेलबागसंग्रह अप्र. कागद)

-''- -मार्ग. व. ७ इ. १७६८ डिसे. ३० (सु. ११६९ सावान २०) भगवंतराव त्र्यंबक प्रतिनिधींनी नानांना मेणोली गांवचाच जिल्हेकडील अमल, घासदाणा सुभेमजकूर व स्वारीपटी-सह- दिला. (भानू फडणीस सं. बेलबाग संग्रह अप्र. कागद)

-''- – पौष शु. ५ इ. १७६९ जाने. १२ (सु. ११६९ रमजान ३) नाना फडणीसांना वाईचे देशपांडे हैबतराव भवानीशंकर विवेकाजी गिरमाजी ह्यांनी मेणोली गांवची त्यांची देशपांडे वतनाची जमीन, अदिलशाही काठीनें मोजणीचों, विधे ६०, यल राजावरजा, ही सर्व हक्क उत्पन्नासह दिली. (भानू फडणीस बेलबाग संस्थान संग्रह अप्र. कागद)

-''- पौष शु. १३ इ. १७६९ जाने. २० (सु. ११६९ रमजान ११) साधवराव नानांना कळवितात, महादजी शिंदे यांजकडे पर- गणे वेदलाबाद हा सरजाम म्हणून असतां जप्ती का केली तरी मोकळा करणें व वसूल घेतला तोहि त्यांच्या कमाविस दारास देणें. (पे. व. ३९ ले १०३)

-''- -पौष वद्य ८. १७६९ जाने. ३० (सु. ११६९ रमजान २१)

नानांस माधवरावांची आज्ञा कीं, राघोराम ह्यांचें घर बागणी नजिक इस्लामपूर व पालेकर यांचं घर चांभारगोंद्यात आहे. ती घरें आंतल्या वस्तभाव सुद्धां जप्त करावी. कारण, महादजी शिद्यांचे पदरचे हे दोघे असतां त्यांच्यावरच चालून गेले व मेलेहि, पण घरे वगैरे जप्त करावी. (पे द. २९ ले. २२९)

-''-- माघ शु. ११ इ. १७६९ फेब्रु. १६
परगणे आंबडापूरचा सरदेशमूख, मोकासदार व साहोत्रावाला लक्ष्मण खंडेराव हा लिहितो-नाना, तुमच्यामुळे श्रीमंत पेशवे तीर्थरूपावर कृपावंत झाले. व नागपूरकर भोसले यांजकडील ४ माहाल जप्तीचे सांगत होते. पण आपल्या विद्यमाने कर्तव्य तें करावें हा तीर्थरूपांचा हेत. आपलें ममतेचें पत्र महिपत प्रल्हादास यावे म्हणजे ते चालवितील. (पे. द. २० ले. २२४)

-''- -फाल्गुन २ इ. १७६९ मार्च १० (सु. ११६९ जिलका १) नव्या तोफांचा कारखाना. तोफेचे दळ पातळ होऊ नये म्हणून २।। तर आंतील अंगास व मोहरीचे कंगणीसुद्धां ४ तसू जाडी चरून काम चालविले. हे भांडे दळदार होईल. पण स्वारीस भारी होईल. म्हणून २ तसू दळ कंगणी १।। तनू पंचरसांत तांबे फार पडेसे करावे, रस चांगला जालिया बोलतां भांडेहि चांगले बोतेल. (पे. द. ३९ ले. १०८)

-''- - फाल्गुन शु. १४ इ.१७६९ मार्च २१ (जिल्काद १२)
रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण हृद्याचे पंचगूस (गोदा उत्तर तीर) हून नानांना २० ह. रु. तोफखान्या करता पाठविले. (पे द. २९ ले. २३१)

-''- -फाल्गुन वद्य ५ इ. १७६९ मार्च २७
नानांच्या घरी भोसल्यावरील स्वारीस निघतांना द्योमंत थो. माधवराव यास मेजवानी झाली. ते समई वकुलीच्या फुलासारखे बुटी पागोटे ते फार दिवस बांधत होते.- त्याप्रमाणें दुसरें करावें.





वरकडहि काहीं मेवेजात येईसी असली तर पाठवावी. (पे. द. २० ले. २५७ )

श. १६९१ चैत्र वद्य ९ इ. १७६९ ३० (सु. ११६९ जिल्हेज २२) नानास माधवरावांनी कळविले की, हैद्राबादचा वकील आपा- जीराम हा कराराप्रमाणे वागला नाही. सबब त्याजकडे अस लेले इनाम गांव व मुकासा सरकारांतून आहे ते कमाविस- दाराकडून जप्त करावे. (पै. द. ३९ ले. १११)

-''- वैशाख शु १ ३.१७६९ मे ७ (सु. ११७०) गंगा विष्णु वैद्य नानांना लिहितात, महादजी शिंदे यांनी बाजी नरसिंह यांचे औषध देऊन बरे करण्याबद्दल सांगितले. २५. ह. रु. देण्याची बोली केली. पुढे बाजीस गुण आला. व दिले रु. ६ है. व २. चा गांव. पुढे त्या गांवचा अमल उठवून दिल्हा. तरी आपण अजमेरच्या सुभेदारास व पाटिल बाबास पत्रे पाठवून गांव चालवीत तें करावें. (पे. द. ३९ ले. १२९)

-''- वैशाख वद्य ११ इ. १७६९ मे ३१ (मु. ११६९ मोहरम २४) शिवाजी विटल विचुरकर नानांना लिहितात, पूर्वीपासून या सरदारीची उभारणी आपले घरची आहे. आणकईचे मामल ती आपली हातची आहे. उपरोधिक लिहावेसे नाहीं. यास्तव ऐया सत्वर देविला पाहिजे (पे. द. २९ ले २३७)

-''- कार्तीक शु. ६१७६९ नोव्हें. ४ नाना बाईस जाऊन कृष्णास्नान करून आले. (पं.द. ३७ ले. १७७, १७९)

-''- कार्तिक शु १५ १७६९ नोवें १३ (सु. ११७० रजब १३पा) नानांचा गुण्याचा बंदोबस्त भारी आहे माणूस फार भिते, माणसापासून अंतर पडल्यास मुलाहिजा त नाहीं; असे हरि- पंत माधवरावांना नाना फडणविसांध्या कारभारांतील व्यवस्थेविषयी बोलतांना सांगतो. नाना पुण्यास नाहींत. (पे. द. ३९ से ११७)

श.१६९१ कार्तीक वद्य ८ इ. १७६९ नवंबर २१ (सु. ११७० रजब २१

नाना फडणीसांना मेणोली गांवची सरदेशमुखी, धारकरी, कसरपंचोत्रा, महाल मजकर, पांडवगडाकडील एक चाहूर-स्वराज्य अमलापैकी-येणेप्रमाणे पांडवगडाकडे सरंजाम आनंद-राव भिकाजी रास्ते यांचे तर्फे होता तो दिला व रास्त्यांना हर एक गांवी मिळून त्याचा मोबदला दिला. माधवराव बलाल पंतप्रधानांचें गंगाधर शामराव मामलेदार प्रांत वाई यांस पत्र (भानुफडणीस सं. बेलबाग संग्रह अप्र. कागद)

-''- नाना फडणवीस म्हणतात मी लष्करांत गेलो तेव्हां माधव- रावांचे आरोग्याकरतां कोटी मृत्युंजयाचे अनुष्ठान सांग होई तें करणें असें ठरलें. त्यावरून पुण्यास आल्यावर ब्राह्मण साक्षर चांगले पाहून लिहविलें, मंत्रांच्या परीक्षा ब्राह्मणांच्या घेतल्या. मधुपर्क पूजा करून संकल्प केला. शत ब्राह्मण लाविले. जपास ब्राह्मण पांच पूर्वाभिमुख व पांच उत्तराभिमुख. त्यांत एकेक आश्रितांनी जवळ बसून ब्राह्मणांचे मुखाकडे पहात बसावें. शिक जांभई आली तर रुद्राक्ष मालेचा ओढू नये. तो आश्रि- तांनी पहावा. थो. रावसाहेबांचे दिवाणखान्यांत देवता स्थापन व जप. निद्रेस थोरले देवधर नारायणरावांचें, ब्राह्मण घरीं जाऊं देत नाहीं. हिमायती ब्राह्मण लावला नाहीं. चार महिने ब्राह्मण व्रतस्थ राहणे कठीण या करतां अर्धे बदलतो. (ऐ. ले. सं. ४ पू. १४६५-६६)

-''- पौष वद्य ७ इ. १७७० जाने. १८ (मु. ११७० रम. २०)
प्रधान माधवराव नानांना तोफांच्या कारखान्याविषयी लिहितात- तोफा बोलावयास पहिली जागा लहान, आता बालाजी वामन सांगतील त्याप्रमाणे हत्तीच्या संधान्याप्रमाणे मोठी व बांधवाची, घोडी, उंट, दिवटी याबद्दल व्यवस्था (पे.द. ३९ ले.१२६)

-''- -फाल्गुन शुद्ध १ इ. १७७० फेब्रु. २६ (शु. १९७२ सवाल २९)
मुंबईहून तोफा चांगल्या विकत आणावयास गोलंदाज व पां.कृ. गोडबोले, पाठविले. त्या तोफा आणि किल्ल्यांवरून असलेल्या





उपयोगी तोफा, पाऊस पडूं लागला नाहीं तों, घाट चढून आणवाव्या, असे माधवरावांचे नानांना पत्र (पे. द ३९ ले. १२७)

-''- - फाल्गुन. इ. १७७० मार्च
नाना फडणिसांनी रामशास्त्री यांज करवी पंडित बोलवून निर्णय मागविला कारण की, माघी शिवरात्रीच्या यात्रेत पाषाण येथील शिवालयांमधील श्रीशंकराचा वाण उपटला व उपेहि निघाले. म्हणून कृष्णभट शिवरामभट चित्राव यांनी सांगितलें. (पुरं. द. भा. ३ पृ. १०८)

श. १६९१ फाल्गुन व. ११ इ.१७७० मार्च २३
वारा घटका रात्रीस वाडचांत फितूर जाला. सर्व लोक देवडीचे फितुरले. दादासाहेब बाहेर निघोन जात, तो बातमी नानास कळलो. त्यावरी वाडयांत बंदोबस्ती केली. गुलाबराय खोजास चतुर्भुज केले. काह गाडदी यांचे जमातदार व बिजमतगार ५० । ६० तेहि चतुर्भुज केले. चौक्या बदलून खडे पाहारे केले. कागद फितव्याचे सांपडले. श्रीमंताकडे सांडणी- स्वार गेले. आज्ञेप्रमाणे शासन होईल. ५७ ब्राह्मण मंडळीह फितव्यांत होती (ऐ. ले. सं. ३ पृ. १३७०, १३३३)

-''- -कार्तिक वद्य १४ इ. १७७० नवें. १६ (सु. ११७१ रजब श. विकृती संवत्सर)
मौजे वावजे तर्फे तलोजे प्रांत कल्याण हा गांव माधवराव प्रधान यांनी नानांना तेथील स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फा, देखील सरदेशमुखी, सरपाटिलकी, इनामतिजाईसुधा दरोबस्त इनाम दिला. भानू फडणिस सं. बेलबाग संग्रह अप्र.

श. १६९३ चैत्र शु. ५ इ. १७७१ मार्च २१ (सु. ११७१ जिल्हेज ४ शक)
माधवराव बलाळ प्रधान यांजकडून नानांना प्रांत वाई हवेली पैकी एकसर हया गांवची जमीन हैबतराव भवानीशंकर व राघो व्यंकटेश देशपांडचे यांनी वतनी होती त्यापैकी अर्धा चाहूर दिली त्याबद्दलचें

भोगवटापत्र दिलें. (भानू फडणीस सं. बेलबाग संग्रह अप्र. कागद)

श. १६९३ भाव. शु. ९ इ. १७७१ सप्ट १७ (जखर ७)
सखारामबापू नानांना लिहितात कीं, चिंचवडी नन्हेकर यांच्या सुनेनें जीव दिला. पण गोत्रजांस आपंक्त केले. शास्त्रमतें पाहतां हा दोष नाहीं. देव, रामशास्त्री यांस सांगोन मुक्तता व्हावी. यांची घराणी थोर आहेत. (पे. द. ३९ ले. १३७)

-''- - कार्तीक शु १ इ. १७७१ नवें. १३ (सु. ११७२ साबान ५)
आबाजीराव कृष्ण प्रतिनिधी यांनीं नानांना मौजे देवधे तर्फ लाजे सुभा प्रांत राजापूर हा गांव नूतन इनाम दिल्हा. (भानू फडणीस सं. बेलबाग संग्रह अप्र. कागद)

-''- -मार्ग. वद्य १० इ. १७७१ डिसें. ३१ ( इसने रमजान २४)
माधवरावांच नानांना जिव्हाळयाचें पत्र कीं, तुम्ही मेण- यलीस केव्हां पोचला, पुण्यास कभी जाल ते लिहून गेल्यावर जो खर्च उणा केल्याने कामास येई तो जरूर करावा. किल्ले, महाल, इमारती यांजकडील सर्वहि उणा करण्यास पेच नाहीं तो पाहून करावा. कमाविसींचें जमेचें कलम अधिक साधाय- याचे तें साधण्यांत यावे. तुम्ही करीतच आहां. परंतु पुण्यास सत्वर जाऊन हैं मनन करावे. तो० रा. दादांची प्रकृति कशी आहे ? चौकीपहारा बंदोबस्त एकदोनदां मनास आणून दर- जशी वाटेल तें नीट व्हायें. सिद्धटेकचे सुमारें जाणें होईल. (ऐ. पत्रव्यव. ले. १२७ पू. १०६-०७ पू. १२. १६८६ पहा)

-''- १९९३ पौष वद्य ६ इ. १७७२ फेब्रु. २५ (११७१ सवाल १९)
तर्फ जेऊरपंकों खाडके येथील तनखा जहागीर नानांना मिळते. तसेंच ॱ मौजे दसके गव्हाण तर्फ जेऊर हा गांव नाना व दादा फडणीस यांजला मिळतो. (भानु फडणीस सं. बेलबाग संग्रह अप्र. कागद)

-''- -इ. १७७४





हया शक वर्षों गुरूचा राशिभेद होत नाहीं. त्यास ह्या वर्षास नांव काय द्यावे याबद्दल पंडीत व ज्योतिषी यांची सरकार-वाड्यांत नानांनी सभा घेऊन निर्णय केला की, लुप्त संवत्सर नव्हे. आर्यसिद्धांत सूर्यसिद्धांत, ब्रह्मसिद्धांत ह्यावरून नसले तरी ग्रहलाघवाचे स्फुटगतीनें मात्र अधिसंवत्सर येतो.
(श. १६९३ त सूर्य कुंभ राशिगत होता, श. १६९४ त मीनराशीत आला आणि १६९५ वर्षभर मीनराशीतच होता. व श. १६९६ मध्ये तो मेष राशीत गेला. अर्थात् १६९५ मध्ये राशीभेद नाहीं. मांगल्य कार्य केल्यास प्रत्यवाय नाहीं. अधिमासाप्रमाणे हा प्रश्न होय) (पे. द. ४३ ले, ८०)

श. १६९६ चैत्र २६. १७७४ मार्च १४
नानांचे वामनराव व परदारामभाऊ पटवर्धन यांस पत्र योजिला मनसा शेवटास व्याया. आम्ही उभयतां आता साताव्यास जाऊन राजमंडळाचें सरदार वगैरे सर्व तुम्हांस उपयोगी पडसें करतों. सर्व एकचित्तें केलें. (ऐ. ऐ. सं. ५ ले. १३५१)

-''- - चैत्र वद्य ३ इ. १७७४ मार्च ३० (आर्बा मोहरम १७ )
नाना पटवर्धनांकडील वामनराव बाबा, परशरामपंतभाऊ व रघुनाथराव यांना लिहितात, बहुत सावध असावें. सर्वांचें मनो-धारण रक्षावें, मान अपमान मनांत न आणून बातमी फार राखीत जावी. छाप्याचे वगैरे दगे होतील (ऐ. ले. सं. ५ ले. १३५५)

-''- - नानांचें महादजींस पत्र, राघोबादादा खानवेशांतून पळत नर्मदापार जात असले तर जाऊं न द्यावे. तुम्ही व होळकर एक होऊन आडवें व्हावें. बलाबल पाहून हस्तगत करावें. न बने, तरी, तुम्ही त्यांस न मिळावें. रोख चुकावून एकीकडे व्हावें. तुम्ही जलदी येऊन पोहचावें. ( म. शि. का. ले. १)

-''- -अ. वंशाल च ८ इ. १७७४ मे (सफर २१)
तुकाजी होळकर नाना फडणिसास लिहितात, पत्रोत्तरें न पाठकारण

महादजी सिंदे यांचे वाचताची सफाई नव्हती. त्याची दुरुस्वाई होऊन स्वामिसेवा एकरूपपर्णे करावी, या अर्थ निखालसा जाली. श्रीमंतांची-राघोबादादा -गांठहि अचानक पडली; निरोपाय जाणून ताकपीरहि भेटले; पुढे श्रीमंत इकडे येणार; पेविसी वित्तात आमचे विषयों पर्यास आला असेल. पण येथील विचार आपल्याखेरीज नाही. जे कर्तव्य ते आपल्या लक्षानेच होईल. (पे. द ५.. ४६ महा. का. ले. २)

श. १६९६ वैशाख इ. १७७४ मे.
हरिपंत फडके यांचे वामनराव बाबा व परदारामभाऊ पटवर्धन यांत पत्र को अब राघोबादादांच्या खेळाचा कज्जा लुटावा. बापू नाना सातारयास वस्त्रे आणावयास गेले. पत्र आलो । ऐ. ले. सं. ५ ले. १३७५. ह्या पत्राची वस्ती सु. ११७६ (१) रवल ४ आहे. वर्षाचा ऑकडा अक्षरी आहे.)

-''- भाद्र ६ इ. १७७४ सप्ट २६ (रजब १९)
नाना रामशास्त्री यांस लिहितात. सांप्रत मनसुब्या होतात. चौधाचा उपरोध पडतो. ऐशास आम्ही आपले तर्फेने शफत पू हेच सांगतों की, संशय न धरता आपणहि शफत पूर्वक ईश्वर स्मरोन, आमची अगर दरबारात मातबर आहेत त्यांची नोड न परता, न्याय करून विल्हेस लावीत जावे. (असे पत्र सखाराम शास्त्री यांस आहे.) (पै. द. ५ से ५८)

-''- भाद्र, ६ इ. १७७४ सप्टें. २६ (रजय १९) नाना रामशास्त्री यांस लिहितात. सप्रित मनसुब्या होतात. चौघाचा उपरोध पडतो. ऐशास आम्ही आपले सर्फेनें शफतपूर्वक हेच सांगतों की, संशय न धरता, आपणहि शफतपूर्वक ईश्वर स्मरोन, आमची अगर दरबारांत मातबर आहेत त्याचो भीड न धरता, न्याय करून विल्हेस लावीत जाये. (असेच पत्र सखारामबापूंचेंहि शास्त्री यांस आहे.) (पे द. ५. ५८)

-''- कार्तिक शुद्ध इ. १७७४ नोयें. प. पंधरवडा





नाना व सखारामपंत, गंगाबाई व स. माधवराव यांस दगा करून मारावें. राज्यांत करावे हा मनाची पा मुळे नाना वगैरे एवं पुरंदरावर माचीस सरावहून गेले. (ऐसे सं. ५. ले. १४०५)

-''- -मार्ग इ. १७७४ डिसें. मोरोबादादांनी पुरंधरगडच्या गडकन्याशीं कांहीं गुप्त संधान केले. हे नाना व बापू यांस समजतांच त्यांचा प्रमुख शिंदे यांचे पारिपत्य करून बंदोबस्त केला. (ऐ . सं. ५ पू. २२१६)

श. १६९६ पौष शु. ८ इ. १७७५ जाने ९.
नाना व सवारामपंत बापू फौजसुद्धां बऱ्हाणपुरचे पुढे १६ कोसावर फैजपूर येथे आहेत. (ऐ. ल. सं. ५ ले. १४२८; का.प. या ४८०)

-''- पौष वद्य ४. १७७५ जाने. २० (सु. ११७५ जिल्काद १७)
निजाम अलीखान नानांना सखाराम बापूयरोबर भेटले. त्या- वेळी कमाविस भेट वस्त्र ६ (रु. २७० ।। व ५२५) आली.
(स. मा. रो. १ पू. २८१ ऐ. ले, सं. ५ पू. २२८६)

-''- पौष वद्य इ. १७७५ जाने.
नाना यांची वापूंच्यासह राघोबादादांशी भेट श्री भीमातीरों झाली. ६ दिवस समागमें होते. वामनराव परदारामभाऊ, रघुनाथराव पटवर्धन मंडळीहि भेटीचे वेळी होती. (ऐ. ले. सं. ५. पू. २२८३ अमावस उभयकारांचा मुकाम गंगेवर)

-''- - माघ शु. १२. १७७५ फेब्रु. १२
नाना मेणवलीस काल गेले आहेत. आल्यावर १५० रावतांस निरोप देऊन रवाना करतो. (ऐ. ले. सं. ५ पू. २२८९-९१, २२९४६ - ९६)

-''- - फाल्गुन शु ३ इ. १७७५ मार्च ४ नाना मेणवलीस ग्रहणास गेलें ते तृतियेस येणार (माघांत पौणिमेला चंद्रग्रहण होते.) (माघ शु. १२ स गेले. ऐ. ले. सं. ५ पू. २२९८)

-''- -भाद्र. वद्य १ इ. १७७५ सप्टे. १० (सु. ११७६ रजब १४) महादजी शिवे यांसी करार सरकार लक्ष तुम्ही परिछिन धरावें, बाबासाहेबांचं लक्ष सर्वात्मना धरू नये, दादांकडे कागद- पत्री राजकारण असतील ती बिलकूल मोडावीं. शपथपूर्वक मनांत धरून हे करावें. (महादजी कागद० ले. १४ पू. १६)

-''- - भाद्र. व. ७ इ. १७७५ सप्टें. १६ (सु. ११७६ रजब २०) बाळाजी जनार्दन यांनी मोरो बापूजी यांस पत्र दिलें कीं, साल-गुदस्ता मुंबईकर इंग्रजाकडील काफील दुर्गचे आरमारानें पाडाव करून आणले. व कपितान व इंग्रज ४ अटकेत ठेविले, त्यांस सोडून रु. ३६० अखाची वस्त्रे व खर्चास रु. २० देऊन स्वतंत्र गलबताने मुंबईस पोंचवावे. (स. मा. रो. २ पू. २७)

-''- -कार्तिक शुद्ध ७ मि. १७७५ आक्टोबर ३१ (रमजान ६) मुधोजी भोसले सेना घुरंदर-नागपूर-यांस नानांचे पत्र महमद असिफ यांस ताजखान रोहिल्या करवी घरून बेडी घालून शिवनीस आणला. फार सरस केले. आपला व श्रीमंतांचा पूर्वी पासून घरोबा, स्नेह व एकात्मता, तेच लक्ष आपले आहे. त्याच रोतीने येथून दुसरा विचार नाहीं. अलंकाराचा विषय - (श्रीमंत छत्र० स्वामींच्या राणीच्या पायाच्या सोन्याच्या सावळया प्रसादिक म्हणून आपण मागविल्या. आम्ही महा- राजांकडे विनंती केली. आत्या की, पाठवितों. ले १४९). लिहिले हे उचित. (ऐ. पत्रव्य. ले. १५०)

-''- - कार्तिक वद्य १७७५ नोवेंबर पहिला पंधरवडा. नाना मेणवली येथे गेले. (ऐ. ले. सं. ५ पृ. २४२१)

१६९७ मार्ग. शु। १२ सोमवार १७७५ डिसें. ४ (सु. ११७६ सवाल १०) नाना स्त्रीच्या वर्षश्राद्धासाठी आजच मेणोलीस गेले. पौर्णिमा करून येणार. ११।। ह. रु. च्या वराता करू त्याप्रमाणे यावे असे नानांनी पटवर्धनांस सांगितले. ( ऐ. ले. स. ५ पू. २४३७)

-''- - पौष शु ९, १० इ. १७७५ डिसें. ३०, ३१ इंग्रजाकडील





वकील कर्नल आपटम् येऊन पुरंदरगडाखाली डेन्यांत कारभारी-बापू व नाना आणि स. माधवराव यांच्या भेटी झाल्या. सर्वांनी पेशव्यांस नजर केली. हया भेटीतील युरोपियन पोषाखाचा परिचय दृष्टीस असावा म्हणून नानांनी आधी तशी व्यवस्था केली होती. (ऐ. ले. सं. ५ ले. १७६४)

-''- - फाल्गुन वद्य १ इ. १७७६ मार्च ६ (सु. ११७६ मोहरम १५) इंग्रजाकडील वकील कर्नेल इपटेन यांजकडून सखारामबापूस ३८१।। व बाळाजी जनार्दन यांस ३६८ रु. ची शाल वगैरे वस्त्र भेंट आली. (स. मा. रो. २ पृ. ६०)

श. १६९८ ज्येष्ठ वद्य १३ इ. १७७६ जून १४ (सु. ११७७ रखर २६) रघुनाथराव दादासाहेब यांजकडील मराठे सरदार, कारकून, शिष्ये इत्यादींची घरें तालुकेहाय कोकण येथे आहेत. त्यांनी कोणी दादांच्याकडे जाऊं नये; गेल्यास त्यांची घरें वगैरे जप्त करण्या बद्दल वसई, कल्याण, नैरले, राजपुरी, बेलापूर, बीरवाडी वगैरे ठिकाणदारांस १८ सनदा नानांनी दिल्या (स. मा. रो. १ पू. १३२)

-''- -शावण शुद्ध १४ इंदुवार इ. १७७६ जुल २९ नानांची पत्नी पुण्यांत बरेच दिवस आजारी होती तीस देवाज्ञा झाली (ऐ. ले. सं. ६ ले. १८७५. जंत्रींत १४ चा क्षय आहे.)

श. १६९८ ज्येष्ठ वद्य १३ इ. १७७६ जून १४ (सु. ११७७ रखर २६) रघुनाथराव दादासाहेब यांजकडील मराठे सरदार, कारकून, शिष्ये इत्यादींचों घरें तालुकेहाय कोकण येथे आहेत. त्यांनी कोणी दादांच्याकडे जाऊं नये; गेल्यास त्यांची घरे वगैरे जप्त करण्या बद्दल वसई, कल्याण, नंरले, राजपुरी, बेलापूर, बीरवाडी वगैरे ठिकाणदारांस १८ सनदा नानांनी दिल्या (स. मा. रो. १ पृ. १३२)

-''- -शावण शुद्ध १४ इंदुवार इ. १७७६ जुलै २९ नानांची पत्नी

पुण्यांत बरेच दिवस आजारी होती तीस देवाज्ञा झाली (ऍ. ले. सं. ६ ले. १८७५. जंत्रीत १४ चा क्षय आहे.)

-''- - पौष शु. ४ इ. १७७७ जाने. १३ (सु. ११७७ जिल्हेज ३)
बाळाजी जनार्दन भानू खोत मौजे इलणे (तर्फ केळशी ता. सुवर्णदुर्ग) यांच्या विनंतीवरून इलणे गांवची सोती भानूची भानूकडे सरकारांकडून चालती केली. मध्यंतरी बांधकरी खोती चालवीत होते. तरी सालमारी पाहणीमुळे ठरेल तो जमाबंदी वसूल घेणें. (स. मा. रो. २.पू. २२०)

-''-- पौष शु. १५ गुरुवार इ. १७७७ जाने. २३
नाना मेथोलीस चंद्र ग्रहणासाठी गेले (ऐ. ले. सं. ले. १९८७)

-''- आश्विन वद्य ८ इ. १७७७ आक्टो. २४ (सु. ११७८ रमजान २१)
बाळाजी जनार्दन यांजकडे फौजेचे वेगमोस सरंजाम-परगणे सरभुवन (गुजराथ), परगणे भोकर (बागलाण), चोपडे व जलोद (खानदेश), कोतूळ, अंतू (दौलताबाद) हे सहा पर- गणे: सेलगांव व विव (कन्हाड), माणीक दोड (पांडेपेड- गांव) ही तीन गांवें दिली. (स. मा. रो. १ पू. २५७)

-''- - माघ ११ . १७७८ फेब्रु.- २३ (मोहरम २४ भीम)
नाना पुण्याहून पुरंदरास आले. मोरोबादादा समजाविशीचे बोलणे होत असतां त्यांजकडील बोलण्यात स्वच्छता नाहीं. नाना शिवरात्रीसाठी मेणवलीस गेले (ऐ. के सं. ६ले. २२५४ २२५५)

-''- - चैत्र वद्य ११ ३.१७७८ एप्रील २३ (सु. ११७८ रवल २४)
करवीरकर छत्रपतींचा महादजी शिद्यांशी तह. त्यांत बापू नाता वगरे मुत्सद्दी यांस पेशजी यादीप्रमाणें इनाम गर्वि दिल्या व नोंद आहे. (ऐ. ले सं. ६ पू. ३२१९-२०)

श. १७०० ज्येष्ठ शु १२ इ. १७७८ जून ६ (जवल ७)
नेने याणी पुराहून जाणविलें जें, अजापालासह कपि निरेवर भेटीस येणार असे ऐकले वरून त्यानी कळविले. त्यास जशी 'कवडी' तशीच 'नीरा' दिसते. वडिलो सावध असले पाहिजे. (कवडी मुक्कामी सखाराम बापू मोरोबाच्या भेटीस गेले त्याचा परिणाम नानावर प्राणसंकट ओढवले. तसेच ते आतां निरे- वर शिवास भेटणार, भेटल्यावर शिंदे व बापू व होळकर सारे एक होऊन तुम्हांस देगा होईल, या करितां सावध रहा, असा इवारा आहे.) (ऐ. लें. सं. ७ ले. २३५५)





१७०० भाद्रपद ११.१७७८ सप्टे २ (सामान १० तिसा)
नानांना! आनंदीबाई- राघोबादादा पत्नी-स्वहस्त-पत्र लिहि तात, आम्ही होऊन पत्र न पाठविलें. फारणाखेरीज पत्रे पाठवितात, म्हणोन तुम्हीच हंसाल. हल्ली कारण कीं, तुम्ही तीन पिडांचे दौलतेंतील फडणीस. ब्राह्मणी दौलत पवनात ( इंग्रज हस्तगत) होऊ पाहते. इंग्रेज बुंदेलखंडापर्यंत दोन कंपू आले ! आणिकहि मागून येणार. याचा बारोकमोठा विचार तो तुम्हीच करणे आम्हांस म्हणाल तर आपला जीव कोणास नकोसा नाहीं. आम्ही पावणे दोन वर्षे जाहली. तुमचे स्वाधीन तुमची फौज गुंतून, धन्याचे पायासी वियोग हैं उभयपक्षी नुकसान तर आम्हांस मुंबईस जाण्याविषयों थोडेकरांस पत्र लिहिणें. हे आशीर्वाद. इ. सं. ऐ. टि. १-१९ (ह्याच तारखेस बापूनाहि जवळ जवळ असेच जरा अधिक आपुलकीचें व विस्तृत पत्र आहे. ले. २०)

-''- पौष वद्य २ इ. १७७९ जाने. ४
नाना फडणीस व धोंडोपंत नित्सुरे यांनी कॅप्टन इस्टुरा याची बकराची रसद घाटबंदी करून बंद केली (पे. व. ४० ले. ४)

-''- - माघ शु इ. १७७९ जानेवारी परशरामभाऊंचें चि. गणपरावास पत्र- दुसरा पंधरवडा ( पौष वद्य ९ जानेवारी ११)
'इंग्रजांचा मोड जाहला. चार पांचशे माणूस मारिले. पांच तोफा व दोन गरनाळा सरकारांत पाडाव आणिल्या. शिवाय दोन हजार बंदुका वगैरे लूट सांपडली. तळेगांव नजिकचे वडगांव येथे

इंग्रज कोंडिले आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेब निघोन गेले आशी आवाई, परंतु त्यांत आहेत–'' या प्रमाणे राजश्री नानांचं स्वदस्तुरचें पत्र, पुरंदराहून आम्हांस आले ते आतांच प्रथम प्रहर रात्रीस पावलें, पत्र पाहून खुशालीच्या तोफा करविल्या. (ऐ. ले. सं. ७ पृ. ३३९१ ले. २४५९)

श. १७०१ इ. १७७९ एप्रील
वॉरन हेस्टिंग नानांचा बडगांवचा करारनामा मान्य समस्यायें कळविले. (अुत्तर भाग १–म.रि. उ. २१५)

–''– –वंशाला २ इ. १७७९ एप्रील १८ (पु. ११७९ रपर १) बाळाजी जनार्दन पुणे येथें सवाई माधवरावांचा व्रतबंध– निमंत्रणास गेले तेव्हां त्यांस अहेर आले ते विट वगैरे मुंश समारंभ पंचमीस पर्वतोवर झाला. शिंदे होळकर वगैरे आले होते. रा. नाना गंगास्नानास जाणार. (ऐ. ले. स. ७ . २४९८)

–''– – माघ इ. १७८० फेब्रु. पहिला पंधरवडा
नाना आणि महादजी शिंदे या मध्ये सलोख्याचा करार झाला तरी उभयतांची मनें तितकी निर्मल व निःशंक नव्हतो. प्रथम शिंदे यांनी आपणांस नानाच्या वर्तनांतील कांहों गोष्टीविषयी कसा संशय आला तें सांगितले. महादजींनी ' राज्याचे व नानांचे कल्याण त्याच गोष्टी केल्या असतां फलादेश ऐसा; असे म्हटले तो कलमे ९ ले. ५९ व हचा संशयाचें निराकरण मानांनी उत्तमपणे केले आहे. त्यांत ते म्हणतात 'गंर वाजवी ज्यांचे काम असतें त्याचें मनाजोगे जालें नाहीं म्हणजे तो भलतेच लिहितों.' शिंदे यांशी 'आम्ही जन्माचा भाऊपणा मेळविला तेथे अशा कल्पना कशा येतील.' 'सरकार किफायतीची वाजवी कारों हजारों सांगोन पाठवावीं तीं आम्ही करावी हीच इच्छा आहे. तेथे तपशील कशास ' सर्वांचे डोळे पाटिल– बाबांकडे आहेत. हे नमूद जालें म्हणजे सर्वांस गोष्ट मसलतीस लागणें प्राप्त नाहीं तरी हाताचे





पायावर घालतील. याज– करता दर पे लिहीत गेलों इ. इ. फलमे १० (महा. का. ले. ७७)

–''– पौष वद्य ५ इ. १७८३ जाने. २३ (सफर १९) अहल्याबाई म्हणतात श्रीमंताच्या पायापाशी एकनिष्ठता, कायम मिजाज असा दुसरे कोणाचा पाहिल्यांत आला नाहीं. शाबास हाच ब्राह्मणांची. गेलें राज्य संभाळले. नानांच्या एकनिष्ट– तेस लोकी उपमा नाही. उभयतांहि कारभारी चांगले. (म. द.वा. पू. १७६ से. ८३)

श. १६९३ पौष वद्य ६ इ. १७७२ फेब्रु. २५ (११७१ सवाल १९) तर्फ जेऊरपैकी खाडके येथील तनखा जहागीर नानांना मिळते. तसेंच – मौजे इसके गव्हाण तर्फ जेऊर हा गांव नाना व दादा फडणीस यांजला मिळतो (भानु फडणीस सं. बेलबाग संग्रह अप्र. कागद)

–''– –श्रावण शु. १ इ. १७८३ जुलै ३० ( सु. ११८४ साबान २९)
गोपिकाबाईचे नाना विषयों प्रशंसोद्गार – फडणीसपंत तसेच विश्वासू यशस्वी आहेत. फितुरी झाले त्यांची यथायोग्य पारिपत्य केली. इतरहि कर्तबगारीवर फार संतोषी. इतके करतोलसा भरोसा नव्हता. चिरंजिवांनी (माधवराव) कृपा केली स्थाचें सार्थक उभयतांनीं (नाना व हरीपंत किंवा महादजी) केले. संतोष आहे. (इ. सं. ऐ. टि. ११. ३२, ३३)

–''– – भाद्रपद वद्य ९ इ. १७८३ सप्टें. २० (सवाल २२)
अहिल्याबाई बोलली जे, 'ईश्वर करो. आणि त्यांची (राघोबा नाना इ. यांची) घरांत समजूत पड़ो, नि दुनियेचा कांच तुटो. यांत सर्वांचें बरें आहे. नाना कृपा करितात तेवढे आमचे तिलों आहे. जेथे न पोहोंच, तेथेच विस्कलित होते. शाबास त्यांचीच (नाना, हरिपंत इ.) छाती त्यांत उपमा देयास दुसरा नाही. दादासाहेबांनी इतकी घाण केली. (स. द. बा. भा. १ ले. ११० पु. २१९)

–''– –मार्गशीर्ष १२ १७८३ डिसें. ५ (मोहरम १०) राघोबा म्हणतात, नाना व हरिपंत प्रामाणिक आहेत. आज पावेतों बोघांनीं

शपयक्रिया दिली नाहीं. वरकडांनी देऊन दमामलो केली. मीहि त्वांसी तसाच बर्तलो. नंतर शागो पुण्यास तात्यांस भेटला. तात्यांनी नानांची भेट बेलबागत विष्णुपाशी घेऊन दादांचे आणण्यास मान्यता घेतली. व विष्णूची शपथ घेतली इ. सदाशिव दिनकरचें वार्ता पत्र (महा. का. पृ. ३५८-३५९/)

-''- - आश्विन शु ७ इ. १७८४ सप्टेंबर २१ श्रीमंत राजश्री नाना फडणवीस यांची स्त्री प्रसूत जाहली पुत्र जाहला. सात दिवस होती, उपरांतिक उन्मत्त वायू होऊन आश्विन शु ७ भौमवारी देवाज्ञा झाली. पुत्र सुखरूप आहे. नांव जनार्दन (ऐ. ले.सं. ८ ले. २८०२-०३; पे. सा. २६)

-''- -पौष इ.१७८५ जाने.

नाना संक्रमणासाठी मेणवलीस गेले. ( चंद्र. व. नि. उतारे पू. ६५

माघ- नानांची दोन लग्ने उल्लेख (चंद्र. द. नि. उतारे पू. ६३)

-''- -शावण वा १४ इ. १७८५ सप्टेंबर २

नानांना पुत्र झाला तें सांगावयास आला त्यास रु. ३ (पे.सा. २६)

-''- - मार्गशीर्ष वा ३० इ. १७८५ डिसेंबर ३१ जेम्स अँडरसनने मॅकफर्सनला पत्र पाठविलें, त्यामध्ये नाना फडणीसाकडील सैन्याची सुधारणा व त्याची शिस्त वगैरे वैशि- ष्टचाचा गौरव केला. (पूना रेसी. कॉर० व्हॉं. १ पृ. ३०)

-''- - ज्येष्ठ शु. ६ . १७८६ जून २ पाळी मॅलेटचे ग. ज. स. पत्र पुसेसावळी, सामा व मॅलेट यांचे भेटीचे वर्णन. नानांची वागणूक पूर्ण शिष्टाचाराची आहे. संकटकाळी नानाने एकटचानें पेशवाई संभाळली. वय ५० (४४१ वर्ष) मध्यम बांधा व सडपातळ, चेहन्यावर बुद्धीचे तेज़ पण चेहरा छाप पाडणारा नाहीं. भाषा खास दरवारी नाहीं. पण फांटतोल, न्यायी स्पष्ट व प्रामाणिक, असे मॅलेटचें मत मराठयांनी कबूल केलेल्या विजापूर प्रांत व इतर सवलती दिल्या नाहीत म्हणून निजाम युद्ध सोडून निघून जातो.





नाना सवलती दिल्याचे नाकबूल करतो. व निजाम ऐन युद्धाचे वेळी निघून गेल्या बद्दल असंतुष्ट (पु. रे, फॉ. व्हा. २ प. ९)

-''- - भाद्रपद वा १० इ. १७८६ सप्टें. १७

चार्लस मॅलटचे आचिवाल्ड फाय मद्रास गवर्नर यांस पत्र इंग्रजा-बरोबर नानाची मैत्री कायम व विश्वासही आहे. परेंचाचे प्रतिनिधी बरोबर झालेले नानाचे बोलणे औपचारीक आहे. असा नानाचा मॅलेटला निर्वाळा. नाना सारखी चतुर, बुद्धिवान् व अनुभवी व्यक्ती परेन्वाचे आहारी सहज जाण्यासारखी नाहीं असें मॅलेटचें मत (पु. रे को व्हा. २ पत्र २३ पान ५१ॄ

-''- - मार्गशीर्ष शुद्ध ९ इ. १७८६ नोव्हेंबर ३०

मॅलेटचें ग.ज. अर्ल कॉर्नवालीस यास २९ नोव्हेंबर १७८६ रोजी मॅलेट- नानाची वाटाघाट, मराठ्यांनीं मागितलेली लष्करी मदत देतां येत नाहीं असा ग. ज. चा हुकूम असल्याचें मॅलेट नानास सांगतों. 'पत्र पेशव्यांस द्यावें व नंतर मला (नाना) मिळेल.' असें नाना थंड व शांतपणे सांगतो. सर्व कौन्सिलच्या विचाराने ठरलेल्या मसुद्याला असा लवचिकपणा असतो, याबद्दल नाना आश्यर्य दाखवितो. कॉन्सीलने मदत देण्याचा ठराव केला तेव्हां टिपूचें चढाईचें धोरण होतें व परेंचही

(१७०८) - जोराने हालचाल करीत होते. जातां परिस्थिती बदलली आहे, अशी मॅलेटची मल्लीनाथी, यावर विचार करून नानानें मॅलेटला म्हटले की, महादजी शिंदे याने मदत मागितली तेव्हां त्यांत 'परेंचाचे वाढत्या वर्चस्या विरुद्ध असा उल्लेख होता का? आपणास (मॅलेट) तसे वाटले असे मॅलेटचें उत्तर इंग्रजानी आपले धोरण दुटप्पी ठेवले आहे. जसा नानाचा मॅलेटवर स्पष्ट आरोप व त्याबद्दल आश्चर्य. कारण इंग्रजांनी मदत देण्याचा निर्णय धार्मिक दृष्टीने मुद्दास शुभ मुहूर्तावर घेतला होता. अशा तन्हेचे प्रसंग राजकारणांत येतातच असा नानाचा मॅलेटला टोला. त्यामुळे

कोणासही वाईट वाटण्याचें कारण नाही. (पू. रे. कॉ. बहा २ पत्र ३७)

–''– –ज्येष्ठ व. ८ इ. १७८७ जून. ९ (साधान १४)
आनंदीबाई नाना विषय म्हणते भानूंच्या कुळामध्ये नाना मात्र चौकस बाकीचे सारे भले आहेत. इ. (पे. द. ४ . ५)

## शक १७१० इ. १७८९
## नानांनी गणेश पेठ वसविली

शक १७११ ज्येष्ठ शु ८ इ.१७८९ जून १ (सु ११९० रमजान ६).
इंग्रजाशी तह– बाळाजी जनार्दन पुण्यात कारभारी. नाना पेठ वसवण्या करितां पुण्याचे पूर्व अंगास ६००द ४५० गज इतकी जागा नानाच्या पेठेसाठी घेतली.

–''– –आषाढ शु ७ इ. १७८९ जून २९,३०
कार्नवालीसचं मॅलेटला पत्र.
काशीस वाडा बांधावयाचा व ज्या वेळेस फाशीस जावयाचें तेव्हां त्या वाडयांत रहावयाचे असे नानाचें इच्छेप्रमाणें कार्नवालीसने बनारसच्या रेसिडेन्टला कळविले की, नानांचे प्रतिनिधीस काशीस वाडा बांधण्यास लागणारी सर्व मदत करावयाची. – मराठी राज्यांतील परिस्थिति अशी नाजूक झाली आहे की, आपण (नाना) केव्हां तरी राज्यकारभारांतून निवृत्त होऊं व त्यानंतर काशीस स्वस्थपणे दिवस घालवूं असें नानांस वाटलें. (पुरे, कॉ. व्हा. २ पत्र ७९ पान १४७)

–''– ज्येष्ठ वद्य ५ इ. १७९१ जून २० नाना फडणीस यांनी पुण्यांत सदाशिव पेठेत हौदांत मुहूतन पाण्याचा नहर सोडला. (काव्ये. प. प. पू. ४७१)

–''– कार्तिक शु ८ गुरुवार १७९१ नोबे. ३ (सु. ११९२) नाना स.





माधवरावसाहेबांसह छत्रपतींच्या दर्शनास सातारा किल्ल्यावर छत्रपतींचे सामोरे येणे, भेट, दरबार, नजराणे, देकार व राज्यांना भेट नजराणे; पुण्याकडे येतांना लि किकवी, भुईज येथे आपटे, बरवे, ठाकूर, बाबर, जाधव यांचे घरों मेजबानी. नंतर वाई मेणवली (ऐ. ले.सं. ९ल. ३३९१ पू. रे. कॉ. रहा. २ प १२०)
– नाना नंदिदुर्ग मराठयांनी घेतल्याचे मॅलेटला सांगतो. हरि– पंताकडून बातमी जलद कळावी म्हणून नानांनी डाक केली ती इंग्रजापेक्षां जलद पोचते. वेळी सदर डाकेचा आपण उपयोग करावा अशो मलेटची ग. ज. स सूचना (पत्र १३०)

–''– –मार्ग ८ इ–१७९१ डिसें. ३ (सु. १२०१ रबर ६)
नाना फडणीस यांचा हिंदुस्थानांतील सर्व प्रांताचे नकाशे एतद्देशीयांकडून, इंग्रजांकडून मिळविण्याचा सारणा प्रपत्न चालू असे. त्यांतील एक पत्र हरिपंत फडके पास फर्नाटकांत पाठविले. ते बेंगरूळ, नंदिगड, श्रीरंगपटण इत्यादि नशे एकादो रोगों तयार होतील. बेंगळचा इंग्रजांनी तयार केला तो व इतर पाठवून देतो; प्रत्यक्षास व नक्षास अंतर पडलें सबब पटना पाठविला नाही. नक्षा तयार करविला जाला, म्हणजे पाठवितो. (इति सं. ऐ. टि. २ पू. २ व २१)

–''– – कार्तिक शु १४ इ. १७९४ नोव्हेंबर ६ आज अकरा दिवस झाले नाना फडणीस यांच्या दोन बायका पैकीं एक बायको मरण पावली (पोर्तुगीज वकिलाचें पत्र. पिसुर्लेकर)

–''– – माग. शु. ९ इ. १७९४ डिसें. १ (सु. ११९५ जवल ७)
स. माधवराव पेशव्यांनी दामोदर बलाळ भानू फडणीस म्ह नानांचे दत्तक पुत्र यांस फडणिसांचा दरक ॄ सनद दिली. सरंजाम, नेमणूक, वेतन, गांव चालतील. आणि नवीन देश सरकारांत येतील शिवाय जमा हयाजवर शेकडा २१– प्रमाणे ऐवज पावेल. (इ. सं. पे. द. स. मा. पू. १७५)

शक १७१८ वैशाख वा १४ इ.१७९६ जून ४ (जिलकाद २७ मु. ११९७) नाना यांनी टोक्यास राहण्याविषयीं शिद्यांचा आग्रह फार आतांच बातमी आली कीं, नाना मंदवारी रात्रीस वाईहून रायगडाकडे गेले (ऐ. ले. स. भा. ९ पा. ४९७३ प. ३७९९)

शक १७१८ ज्येष्ठ शु।। १११७९६ जून १६ बाणकोट रेसि० फोर्ट व्हिक्टो० यूथॉप यांस-

नाना इंग्रजाचा पत्रव्यवहार वाटेत उघडून पहातो असे फोर्ट विक्टोरीआचे रेसिडेन्टला कळले. असल्याबद्दल नाना 'घेरा'

येथे गेल्याची बातमी खोटी आहे. १३ जुन १७५६ पर्यंत ना महाड येथेंच आहे-घाटापासून महाडपयत नानाने बीषया बसवल्या आहेत व महाडहून परवाना मिळाल्याशिवाय कोणासही प्रवास करता येत नाहीं कोणताही पत्रव्यवहार कोणी घेऊन जात असेल तर त्यास नानाकडे आणण्याची सक्त ताकीद आहे. नाना सैन्याची व दारूगोळ्याची जमवाजमव करीत आहे. सैन्य रोज वाढते आहे. नाना दरबारचे जवळचे घरांत रहातो. रायगड किल्ल्यावर नानाची तयारी. तोफखाना दारुगोळा, बॉन्स, अनधान्य व सैन्य या सर्वांचा भरपूर साठा. (पु. रे. कॉ. व्हा. २ पत्र ३१२) पान

-हबशी याणी नानास आसरा दिला. मालिट व नाना यांचा संकेत ऐ. ऐ. सं. ९ प. ३८१२

नाक १७१८ ज्येष्ठ वा ६ इ.१७९६ जन २६

नाना फडणीस महाडास गेल्यानंतर शिलेदार व पागा होत्या. त्या सर्वांस निरोप दिला. पंधरा दिवस लोक तेथे होते. हल्लों नानाजवळ सरकारनिसबत कोणी एक नाहीं. खास पकापकी से दीडशे स्वार चाळीस पन्नास भले माणूस व ५०० गाडदी याप्रमाणे तेथे आहेत. रायरी खाली पाचण गांव आहे तेथे होते. किल्ल्यावर एकदोन दिवस होते. हवा बहुत सद मानत नाहीं. हल्ली रायगडास आहेत. कोणी महाडास आहेत असे म्हणतात. साष्टी किल्ला इंग्रज रहावासी





देणार. किल्ल्यांतील सरंजाम काटन मुंबईस नेत आहेत. पाचसात घाट नानानों माणसें लाऊन खमोन खाली उतरावयास उपाय नाहीं याप्रमाणे केले. मोठमोठे वृक्ष तोडून घांट बुजवून टाकिले. मेडा घाट अथवा शेवता घाट याने खाली जावें याप्रमाणे योजना आहे. घाट त खटले आहेत. ते नीट करून तिकिडूनच जावें (ऐ. ले. सं. भा. ९ पा. ४९८६ प. ३८१३)

शक १७१८ श्रावण शु १४ इ. १७९६ आगष्ट १७ बाजीरावाचा पक्ष नानानें उचलून धरला. नानांचे सन्याने त्याचेवर चालून येणाऱ्या दौलतरावाचे सैन्यास मार दिला. नानाचे वैभव व संपत्ति. इतर मानकरी सरदारांचा नानास पाठिंबा. बाजीरावाचे पक्षास मदत करण्याविषयों नानानें इंग्रजास विनंती केली. नानानें टिपू व निझाम यांस सुद्धां मदतीची विनंती केली. नानाची महाड येथे शत्रुविरुद्ध जोराची तयारी चालू आहे: नाना जरी पुन्हा अधिकारावर आला तरी त्यास पूर्वी इतके कर्तुमकर्तुम अधिकार रहाणार नाहींत व यादवी सुरू होईल. त्यामुळे इंग्रजास धोका कमी (पू. रे. कॉ. व्हा. २ पत्र ३१७ पान ४४७)

श. १७१८ कार्तीक वा ५ इ. १७९६ नोव्हेंबर १९ विठलराव गाकों याचे पत्र, नाना फडणीस आंबेगांव येथे पोहचला व पर्वतीजवळ होळकर, शिंदे व मसिर- मलुक हयांची भेट घेतली. रात्री चिमणाजी आपास भेटण्यास नाना गेला. चिमणाजी बायो (भांबुर्डी) येथे होता. नानाकडे २५ हजार लोक आहेत (पोर्ट. वकील पत्र, -पिमुलकर)

श. १७१८ पौष २ इ. १७९६ डिसें. ३१ (सु. ११९७ रजब १) नानांनी बाजीराव रघुनाथ यांस दौलतीचे बंदोबस्ताची कलमें ६ करार करून धन्यानी व कारभारी यांनी बंबाट कशी करावी ते ठरविलें. राजनीतीचा आदर्श असा योग्य उपदेश दौलतीचा दाव व बंदोबस्त चितिला (इ. सं. ऐ. दि. १ पु. ४-५ ले. ४)

शक १७१८ पौष शु९ इ. १७९७ जान. ७ रजब ८

अमृतराव व नाना यांची हिराबागेत भेट झाली, खलबत झाले. अमृतरावानी सांगितले '' अतःपर ओढूं नये सोईस काम लावावे. दादासाहेबांचे ठायीं आम्ही आपणास म्हणतो. आपण श्रीमंतास भेटावें. नंतर ७ रजबी (काल) नाना श्रीमंताकडे गेले. बोलणी झाली. (ऐलस १०-३९००)

-''- -पौष व १४ इ. १७९७ जानेवारी २६

नानांनी कुरबूबा पाट नोट करविला (ऐलेस १०-३९०७)

शक १७१९ चैत्र वा इ. १७९७ एप्रिल २३

नानांनी कालिया मर्दनाची सुवर्णाची मूर्ति देवालयांत स्थापावी म्हणून प्रतिष्ठा केली व तो मुहूर्तावर वे. रामभट आश्रित यांस दान केली. (ऐलेस १०-३९५८)

-''- -भाद्रपद शु १२ इ. १७९७ सप्टेंबर ३ सु. ११९८ रवल ११

नाना यांचे स्त्रीस रजोदर्शन प्राप्त झालें. सालगुदस्ता लग्न झालें. रत्नागिरीचें ब्राह्मण कारकून सुताराची मुलगी तिगस्ता लग्न झालेली. तिला मेणवलीहून आणविलें (ऐ. ले. सं. १०/४०६५)

-''- पौष वा १२ इ.१७९९ फेब्रुवारी १

रा. ज. स. पामर पाना अगारी अपार- बरोबर वाटाघाटीसाठी दिवस हरवू शकला नाही याबद्दल नानाची दिलगिरी-जाना व टिपूचे वकील यांचेमध्ये झालेल्या तीचा निर्णय म्हणजे टिपूचे वकिलानें प्रजानी केलेले सर्व आरोप नाकबूल केले अशी बातमी मुंबईहून इंग्रजी सैन्य दाव्यांचे मदतीकरिता ७२८ दिवसांत निघेल ही बातमी ती पामर मुनशीमार्फत नानांस कळविली व बाजीरावाचे ताबड- तोब उत्तर मागितले. बाजीरावचे बलस्वभावामुळे आपणाला (नानास) काही नक्की सांगता येत नाहीं. पूर्वी अधिकार होता आता अधिकार नाही. तरी ''ट्रीपल अलायन्स ''ला अनुकूल अशी परिस्थिति आणण्यास खटपट करण्याची नानांची





(१७२०) इच्छा असलेबद्दल. नाना भयंकर अजारी आहे तापा- बरोबर छातींतून (फुफुसे) रक्त पडते व फार अशक्त झालेमुळे आधाराशिवाय बसतां येत नाहीं. उतारवयामध्ये असा आजार व त्यावर गात्रीचा उपचाराचा अभाव यामुळे नानाचे जीवास धोका आहे असें पामरला वाटलें. त्याचे मरणामुळे पेशवे व शिंदे यांचे मध्ये उत्पन्न शाळेला सलोखा नाहींसा होईल. आदरणीय वर्तनामुळे उत्पन्न झालेला विश्वास नाहींसा होईल, व राज्यांत अंदाधुंदी माजेल असें पामरचे मत. (पु. रे. फॉ. व्हा. ६ पत्र २०२ पान ३३४)

शक १७२१ फाल्गुन वा ३ गुरुवार अडीच प्रहर रात्री इ. १८०० मार्च १३

नानांचा पुणे येथे त्यांचे वाड्यांत स्वर्गवास. १० सहस्त्र लोक व सर्व मुत्सद्दी जमा झाले होते. (इ. स. पे. ब. स. मा. पु. १८४ ह्याच पानावर फा. व. ४ भृगुवार पहाटे प्रहररात्र असाउरेख आला आहे. तो चूक आहे.) (ऐ. ले. सं. १२ . ५३३६) पु. द. ले. ११. आंबेगांवकर गंगाधरपंत भानू यांचे बंधू प्रभाकरपंत यांनी उत्तर कार्य केलें. गंगाधरपंतांचाच पुत्र दत्तक घेण्याचा विचार. (नानांविषयों तत्कालीन दुःखोद्गार -)

नाना सर्वांचें छत्र, आतां बाळोबाला त्यांचा तेजोभंग होईल. मराठी राज्याचें शहाणपण, समतोलपणा नाना बरोबर ल्यास गेला. (कर्नल पामर) राज्यांतला दाब व नेट गेला (बाळोबा तात्या) सावध पुरुष, मोहरा होता. श्रीमंताचे दौलतीचा आळा गेला. विशालबुद्धीचा, दीर्घ, प्रयत्नी मुत्सद्दी. राज्याची धडगत नाहीं. दोन वर्षे असते तर इंग्रज नाशच पावते; नाना म्हणजे ब्राह्मण्य. सर्वांचे उमेदी उदासीन झाल्या, पुण्याची सामग्री संपली. नानाबरोबर चातुर्य व संयम गेला. (पामर).


गोव्याचे गव्हर्नर व्हंग काबाल हा आपल्या ता. ८ मे १८०० च्या पत्रांत लिहितो. -- हिंदू लोकांमधील अत्यंत बुद्धिमान पुरुष असा

त्याचा लौकिक होता. कोणत्याही कठीण विषयावर त्याचें डोकें चालत असे. तो विशाल कल्पनेचा माणूस असून आपल्या अंतः करणाचा ठाव कोणासच तो लागू देत नसे, तो कोणतेही कष्ट सहन करी. आपल्या योजना कार्य सृष्टीत आणण्याची कर्तबगारी व्यास होती. व वाईट प्रसंगास तोंड देण्यास कचरत नसे. नानांची तेव्हांची थोरली पत्नी १५ दिवसांनी वारली. धाकटी जिऊबाई स. १२ ह. ची नेमणूक व दत्तकाचा अधिकार. सांप्रत नानांचेच वंशज आहेत. बेलबाग संस्थानचे मालक नानांचेच वंशज आहेत.

समाप्त







Page | 33

## नाना फडणीस : कांहीं चरित्र-निर्देश

| शक | इ. सन | |
|---|---|---|
| १६६३ माघ वा ४ | १७४२ फेब्रुवारी १२ | जन्म |
| १६६८ वैशाख | १७४६ एप्रिल | व्रतबंध |
| १६७३ मार्ग. शुा ८ | १७५१ नोव्हें. १५ | पहिला विवाह. विष्णूपंत गद्रे कन्या |
| १६७८ | १७५६ | उत्तरेंत स्वारीवर असतां वडील जनार्दन बाबा यांचा मृत्यू |
| १६७८ मार्ग. शुा ८ | १७५६ नोव्हें.२९ | फडणविशीचीं वस्त्रें मिळतात |
| १६८३ | १७६१ | गोदावरी कायगांवींतीरीं-घाट बांधला |
| १६८४ मार्ग. | १७६२ नोव्हें.- डिसें. | नानाकडील फडणीसी राघोबादादांनीं काढली |
| १६८५ भाद्र.वा १३ | १७६३ आक्टो. ५ | फडणीसीची पुनः प्राप्ती. |
| ,, पौष | १७६४ जाने. | (पुणें) नानावाडा बांधणीस प्रारंभ. |
| १६८८ | १७६६ | बेलबाग-विष्णु मंदिर (पुणें),, |
| १६९० | १७६८ | नानांना मेणवली गांवचा खालसा अंमल मंत्री व प्रतिनिधी कडून मिळाला |
| १६९१ | १७६९ | विष्णु-लक्ष्मी अर्चा, बेलबाग.— |
| १६९६ कार्ति. | १७७४ नोवें. | नाना, बापू, चि. स. राव यांवर मारेकरी. |
| १६९८ | १७७६ | नानास दगा करण्याची मसलत. |
| १६९९ | १७७७ | नानांचें तिसरें लग्न. सावकार गाडगीळ यांची कन्या. |
| १७०० | १७७८ | नानांस पुत्र. नांव जनार्दन. |
| १७०२ | १७८० | नानास व हरिपंतास दगा करावा अशी तिसऱ्यांदा मसलत |
| १७१० फाल्गु.शुा ३ | १७८९ फेब्रु. २७ | नानांचें लग्न. आडिवरें-परांजपे कन्या |
| १७१० फाल्गु व. १२ | १७८९ मार्च २२ | नानांचें महादजींना काशीक्षेत्र सोडविण्याबाबत पत्र. |
| १७११ फाल्गुन | १७९० | पुणें येथें नाना पेठ वसाहत |
| १७१३ जेष्ठ | १७९१ जून | सदाशिव पेठ हौदांत पाण्याचा नहर भीमाशंकर मंदिर-बांधणी प्रारंभ |

| शक | इ. सन | |
|---|---|---|
| १७१४ आषाढ शु.३ | १७९२ जून २२ | ( स० माधवराव ,महादजी शिंदे यांजबरोबर ) दिल्लीच्या बादशहाकडून नानांना वजिरीची फडणिशी मिळते. |
| १७१५ | १७९३ आक्टो. | काशीस दुर्गाघाटावर वाडा बांधण्यास आरंभ |
| १७१६ | १७९४ | दामोदर बळवंत भामू यांस नाना दत्तक घेतात |
| १७१७ | १७९५ | काशीस कर्मनाशी नदीवर पूल-बांधणी |
| १७१८ | १७९६ | रायगड येथें सिंहासनासमोर नगारखाना |
| १७१९ | १७९७ | दत्तक पुत्र दामोदर बळवंत ह्य चा मृत्यु. |
| १७१९ पौष शुा १३ | १७९७ डिसें. ३१ | शिंदे–मुकिरकडून नानास अटक. |
| १७२० आषाढ | १७९८ जुलै | सुटका |
| १७२० भाद्र. | १७९८ आक्टो. | शिंदेबाया व इंग्रजाकडून पुनः अटकेचा यत्न. |
| १७२१ वैशाख | १७९९ मे | पुनः बाजीरावांकडून अटकेचा यत्न |
| १७२१ फाल्गु. वा।३ | १८०० मार्च १३ | नानांचा पुणें येथें त्यांचे वाड्यांत गुरुवारीं रात्रीं स्वर्गवास. |

## नानांचे कांहीं मुकाम

| | | |
|---|---|---|
| १६७७ फाल्गुन | १७५६ मार्च | विजयदुर्ग—स्वारींत |
| १६७८ | १७५७ | श्रीरंगपट्टण |
| १६८२ भाद्रपद | १७६० सप्टेंबर | पानिपतकडे प्रयाण भाद्र. दिल्ली चैत्र, |
| १६८२ फाल्गुन | १७६१ मार्च | बुकिसराई-शु. १४ |
| १६८२ फाल्गुन | १७६१ मार्च | सिरोंज-वद्य-६ ता. २७ |
| १६८३ जेष्ठ | १७६१ जून | टोकें शु. १५–ता. १७ |
| १६८४ फाल्गुन | १७६३ फब्रु. | लोहगड |





